ऊसाच्या एफ. आर. पी. वसुलीसाठी

महसूली वसुली प्रमाणपत्र (आर. आर. सी.)

माहिती पुस्तिका

शेखर गायकवाड (भा.प्र.से.)

साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे.

मंगेश तिटकारे

सहसंचालक (अर्थ), साखर आयुक्तालय, पुणे

साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-०५

संकेतस्थळ- https://sugar.maharashtra.gov.in

दुरध्वनी क्रमांक ०२०- २५५३८०४१/४२/४३/४४

Email: commissioner.sugar@gmail.com

मनोगत

महाराष्ट्रातील सामाजिक, आर्थिक आणि ग्रामीण सर्वांगीण प्रगतीमध्ये साखर कारखानदारी व ऊस पुरवठादार यांचे योगदान महत्वाचे ठरले आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये दर वर्षी रु. २४ हजार कोटी रुपये इतकी एफ. आर. पी. सर्वसाधारणपणे महाराष्ट्रातील ग्रामीण भागात शेतकऱ्यांनी पुरवलेल्या ऊसापोटी साखर कारखान्यांकडून दिली जात आहे. ऊस पुरवठादार शेतकरी यांची संख्या साधारण ३० लाख असून सभासद संख्या २० लाख इतकी आहे. विहीत कालमर्यादेत एफ. आर. पी. देता न येणे, आर्थिक शिस्त व व्यवस्थापन नसणे इत्यादी बाबींमुळे साखर आयुक्तांनी संबंधित साखर कारखान्याच्या विरोधात आर. आर. सी. चे आदेश काढल्यानंतर देखील बऱ्याच वेळा या आदेशांची अंमलबजावणी करताना अडचणी येत आहेत.

संबंधीत जिल्हाधिकारी यांना आर. आर. सी. आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी प्राधिकृत केल्यानंतर संबंधित प्रांत किंवा तहसिलदार यांना त्यासाठी प्राधिकृत केले जाते. या स्तरावर बऱ्याच वेळेला समन्वया अभावी आर. आर. सी. वरील कारवाई प्रलंबित राहाते. परिणामी सर्वसामान्य ऊस उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचे पैसे वेळेवर मिळू शकत नाहीत. यास्तव प्रादेशिक साखर कार्यालये,जिल्हाधिकारी यांचे अधिनस्त आर. आर. सी. आदेशाची अंमलबजावणी करणारे विविध महसूल अधिकारी, संबंधीत साखर कारखाने व आर. आर. सी. आदेशाची अंमलबजावणी कधी होईल या प्रतिक्षेत असणारा सर्वसामान्य शेतकरी या सर्वांनाच एक मार्गदर्शनात्मक पुस्तिका असावी या उद्देशाने या पुस्तिकेची रचना केलेली आहे.

ज्या कारखान्यांच्या विरुध्द आर. आर. सी. आदेश पारित झालेले आहेत ते कारखाने, संबंधित जिल्हाधिकारी, प्रांत / तहसिलदार, त्या कारखान्यास ऊस पुरवठा करणारे बाधित शेतकरी, संबंधित कारखानदार व सर्वसामान्य नागरिक या सर्वांनाच उपयोग होईल अशा माहितीचा समावेश या पुस्तिकेत करण्यात आलेला आहे. ही माहिती साखर क्षेत्रातील सर्वांनाच उपयोग होईल अशी अपेक्षा बाळगतो. श्री.मंगेश तिटकारे यांनी घेतलेल्या प्रयत्नांबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करतो.

दिनांक : ०१ जानेवारी, २०२०
ठिकाण : पुणे

शेखर गायकवाड,
साखर आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

अस्विकरण

Disclaimer

शेतकरी बांधवांच्या थकीत एफ. आर. पी. रक्कमांच्या वसूलीसाठी (आर. आर. सी.) प्रमाणपत्र जारी करण्यात येत असते. त्यांनाही अशा प्रमाणपत्राची वसूली कशा पध्दतीने केली जाते हे त्यांना समजेल अशा भाषेत या पुस्तिकेची रचना केली आहे. सर्वांचे प्रबोधन होणे व वसूलीतील कालापव्यय टाळणे हा याचा मुळ उद्देश आहे. या पुस्तकातील माहिती व लेखन ही त्यास अनुसरुन आहेत. कोणत्याही कायदेशीर दाव्यामध्ये त्याचा उपयोग करता येणार नाही. यासाठी मुळ कायदे, त्यातील निर्णय व तरतुदी तसेच मा. न्यायालयांचे अद्यावत निर्णय संबंधीतांनी पहावेत.

अनुक्रमणिका

अ.क्र.	तपशिल	पृष्ठ क्रमांक
१	**प्रकरण — १** आर. आर. सी. - कायदेशीर तरतुदी	१ ते ८
२	**प्रकरण — २** जमीन महसूल संहिता, १९६६ मधील लागू असलेल्या महत्वाच्या तरतुदी. (अ) जमीन महसूल संहिता, १९६६ (ब) महाराष्ट्र जमीन महसुलाच्या वसूलीबाबत नियम, १९६७ महत्वाच्या तरतुदी. (क) आर.आर.सी.बाबत - महसूल व वन विभागाची शासन परिपत्रके	 ९ ते २७ २८ ते ४१ ४२ ते ५१
३	**प्रकरण — ३** जमीन महसूली वसूली प्रमाणपत्र प्रमाणे — वसूली कार्यवाहीचे टप्पे	५२ ते ६३
४	**प्रकरण — ४** महत्वाचे न्यायनिर्णय	६४ ते ६९
५	**प्रकरण — ५** मालमत्तेचे मुल्यांकन व सार्वजनिक यंत्रणांद्वारे विक्री	७० ते ७७
६	**प्रकरण — ६** शेतकरी बांधवांनो इकडे लक्ष द्या !	७८ ते ८०
७	संबंधीत प्रादेशिक सहसंचालक (साखर) कार्यालयांचे दुरध्वनी क्रमांक, E-mail व पत्ते यांची यादी	८१ ते ८२

प्रकरण-१

आर.आर.सी. - कायदेशीर तरतुदी

➢ आर. आर. सी. पार्श्वभुमी

ऊस पुरवठादार शेतकऱ्यांच्या एफ.आर.पी.नुसार देय असलेल्या ऊस बिलाच्या रक्कमा विहीत कालमर्यादेत साखर कारखान्यांनी देणे अपेक्षित आहे. कारखाना सदर रकमा सूचना देऊनही देऊ शकत नाही या निष्कर्षाप्रत आल्यानंतर व नैसर्गिक न्याय तत्वानुसार सुनावणीची संधी दिल्यानंतर संबंधित कारखान्याचे नावे ऊस पुरवठा- दारांना देणे थकीत असलेल्या एफ.आर.पी.च्या रकमां, तसेच या रकमांची उशिरा अदायगी केल्याबद्दल नियमानुसार द्यावे लागणारे व्याज याबाबत ऊस (नियंत्रण) आदेश १९६६ कलम ८ मधील तरतुदीनूसार आर.आर.सी. प्रमाणपत्र साखर आयुक्त हे त्या संबंधित जिल्हाधिकारी यांच्या नांवे निर्गमित करतात.

जिल्हाधिकारी त्यांचे अधिनस्त तहसिलदार यांना जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील तरतुदीनूसार पुढील कार्यवाही करण्यासाठी प्राधिकृत करतात. संबंधित प्रादेशिक सहसंचालक (साखर), आणि त्यांच्याकडील विशेष लेखापरीक्षक यांनी कारखान्याची स्थावर व जंगम मालमत्ता तसेच थकीत एफ.आर.पी. असलेल्या शेतकऱ्यांची यादी व त्यांना देय असलेली रक्कम या बाबी संबंधीत कारखान्याकडून प्राप्त करुन घेवून संबंधित तहसीलदार यांना पुढील कारवाईसाठी उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते. बऱ्याचदा ज्या कारखान्यांविरुध्द आर.आर.सी. वसूलीचे आदेश पारित केले जातात त्यांच्याकडून माहिती उपलब्ध न करुन देण्याची प्रवृत्ती असते. नियमानुसार लिलाव प्रक्रिया बऱ्याचदा पार पडू न शकल्याने विक्रीची प्रक्रिया वेळेवर पूर्ण होत नाही. तसेच आर.आर.सी. प्रमाणपत्राची वसूली करणाऱ्या सर्व संबंधित घटकांचा समन्वय बहुतेक वेळेला होत नाही. आर.आर.सी. प्रमाणपत्राच्या अंमलबजावणीला यामुळे विलंब होतो. काही वेळेस कसूरदार हे जंगम अथवा स्थावर मालमत्तेची विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न करतात. परिणामी ज्या सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या हिताच्या संरक्षणार्थ व ऊस देयक वसूलीसाठी काढलेली आर.आर.सी. ची कारवाई परिणामकारक ठरत नाही.

या वसुलीची कार्यपद्धती काय आहे, या वसुलीस विलंब केव्हा होवू शकतो हे शेतकरी बांधवांनाही कळणे अपेक्षित आहे. सर्व संबंधितांनी समन्वय होण्याच्या दृष्टीने नेमके काय करणे आवश्यक आहे, जेणेकरुन आर.आर.सी. प्रमाणपत्रांची प्रभावी अंमलबजावणी होवून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना देय असलेल्या रक्कमा लवकर मिळू शकतील यादृष्टीने सदर लिखाण करण्यात आलेले आहे.

+Explanation(1) - Different prices may be fixed for different areas or different qualities or varieties of sugarcane.

+Explanation (2) - When a sugar factory produces ethanol directly from sugarcane juice or B-Heavy molasses, the recovery rate in case of such sugar factory shall be determined by considering every 600 litres of ethanol so produced as equivalent to one tone of production of sugar.

+Explanation (3) - Production of ethanol directly from sugarcane juice shall be allowed in case of sugar factories only.

---

(2) No person shall sell or agree to sell sugarcane to a producer of sugar or his agent, and no such producer or agent shall purchase or agree to purchase sugarcane, at a price lower than that fixed under sub-clause (1).

*(3) Where a producer of sugar purchases any sugarcane from a grower of sugarcane or from a sugarcane growers' cooperative society, the producer shall, unless there is an agreement in writing to the contrary between the parties, pay within 14 days from the date of delivery of the sugarcane to the seller or tender to him the price of the cane sold at the rate agreed to between the producer and the sugarcane grower or sugarcane growers' cooperative society or that fixed under sub-clause (1), as the case may be, either at the gate of the factory or at the cane collection centre or transfer or deposit the necessary amount in the bank account of the seller or the cooperative society, as the case may be.

Sec. (3A) Where a producer of sugar or his agent fails to make payment for the sugarcane purchased within 14 days of the date of delivery, he shall pay interest on the amount due at the rate of 15 per cent per annum for the period of such delay beyond 14 days.

Where payment of interest on delayed payment is made to a cane growers society, the society shall pass on the interest to the cane growers concerned after deducting administrative charges, if any, permitted by the rules of the said society.

Sec. 3[(8) : Where any producer of sugar or his agent has defaulted in furnishing information under Clause 9 of this Order or has defaulted in paying the whole or any part of the price of sugarcane to a grower of sugarcane or a sugarcane growers co-operative society within fourteen days from the date of delivery of sugarcane, or where there is an agreement in writing between the parties for payment of price within a specified time and any producer or his agent has defaulted in making payment within the agreed time specified therein, the Central Government or an officer authorised by the Central Government in this behalf or the State Government or an officer authorised by the State Government in this behalf may either on the basis of information made available by the producer of sugar or his agent or on the basis of claims, if any, made to it or him regarding non-payment of prices or arrears thereof by the concerned grower of sugarcane or the sugarcane growers co-operative society as the case may be, or on the basis of such enquiry that it or he deems fit, shall forward to the Collector of the district in which the factory is located, a certificate specifying the amount of price of sugarcane and interest due thereon from the producer of sugar or his agent for its recovery as arrears of the land revenue.

Sec. 3(9) : The Collector on receipt of such certificate, shall proceed to recover from such producer of sugar or his agent the amount specified therein as if it were arrears of land revenue.

Sec. 3(10) : After effecting the recovery, the Collector shall intimate to the concerned growers of the sugarcane or the concerned sugarcane growers co-operative societies through a public notice to submit their claims in such a manner as he considers appropriate within thirty days:

Provided that the Collector may, for the reasons to be recorded in writing allow the submission of claims after the period so specified if he is satisfied that there was sufficient cause for not submitting such claim earlier.

Sec. 3(11) : If the amount recovered is less than the amount specified in the certificate under sub-clause (8), the Collector shall distribute the amount so recovered among the concerned growers of the sugarcane or the concerned sugarcane growers co-operatives in proportion to the ratio determined by the Collector on the basis of the sugarcane supplied by the concerned growers of sugarcane or the sugarcane growers' co-operative society as the case may be.

Sec. 3(12) : If the amount recovered and distributed under sub-clause (11) is less than the amount specified in the certificate under sub-clause (8), the Collector shall proceed to recover the remaining amount, as if it were arrears of land revenue till the full amount is recovered and distributed to satisfy the remaining claims.

<u>Sec. 3(13) :</u> If the amount is given to the concerned sugarcane growers co-operative societies, it shall distribute the amount through cheque/draft/or any other recognised banking instrument on any Scheduled Bank to the concerned sugarcane growers within ten days of the receipt of the amount from the Collector.

<u>Sec. 3(14):</u> If the concerned sugarcane grower or the concerned sugarcane growers co-operative society do not come forward to claim or collect the amount so recovered by the Collector within three years from the date of the public notice referred to in sub-clause (10), the unclaimed amount shall be deposited by the Collector in the Consolidated Fund of the State.]

ऊस (नियंत्रण) आदेश १९६६ च्या इंग्रजी तरतुदींचे थोडक्यात मराठीत आशय.

<u>ब) ऊस (नियंत्रण) आदेश १९६६ मधील तरतुदी :-</u>

कलम ३: साखर उत्पादकाला देय असणाऱ्या उसाची किमान किंमत.

केंद्र सरकार अधिसूचनेद्वारे, संबंधीत प्राधिकरण, संस्था किंवा संघटनांशी सल्लामसलत केल्यानंतर अधिकृत राजपत्रात वेळोवेळी उत्पादकांना देण्यात येणाऱ्या ऊसाची किमान किंमत निश्चित करेल. ही किंमत निश्चीत करताना खालील बाबींचा विचार करण्यात येतो. —

(अ) ऊसाचा उत्पादन खर्च;

(ब) पर्यायी पीकांच्या लागवडीतून आणि इतर शेतीमालाच्या विक्रीची साधारण किंमत;

(क) ग्राहकांना योग्य किंमतीत साखरेची उपलब्धता;

(ड) ऊसापासून उत्पादित होणाऱ्या साखरेची किंमत आणि तिची विक्री किंमत;

(इ) ऊसाचा सरासरी साखर उतारा: आणि होणारे साखरेचे उत्पादन;

(२) [केंद्र सरकार किंवा केंद्र सरकारच्या मंजुरीने, राज्य
सरकार, अशा परिस्थितीत आणि कलम 3-ए मध्ये निर्दिष्ट केलेल्या अटींच्या अधीन, निश्चित केलेल्या किंमतीत योग्य ती सूट देवू शकते.]

(३) [स्पष्टीकरण-

(१) वेगवेगळ्या क्षेत्रातील वेगवेगळया जातीच्या ऊसाला वेगवेगळ्या किंमती निश्चीत केल्या जावू शकतात.

(२) जेव्हा साखर कारखाना थेट उसाच्या रसापासून किंवा बी-हेवी मळीपासून इथेनॉल तयार करतो, अशा साखर कारखान्याच्या बाबतीत प्रत्येक 1 टन साखरेचे उत्पादना पासून 600 लिटर इथेनॉलचे उत्पादन तयार केले जाते.

(३) केवळ साखर कारखान्यांना थेट ऊसाच्या रसातून इथेनॉल तयार करण्यास परवानगी देण्यात येईल]

(२) उप-कलम (1) अन्वये निश्चीत केलेल्या किंमतीपेक्षा कमी किंमतीत कोणतीही व्यक्ती साखर उत्पादक किंवा त्याच्या एजंटला उसाची विक्री करणार नाही किंवा अशा विक्रीबाबत करार करणार नाही.

[**कलम (३-A)** जेथे साखर उत्पादक उसाची खरेदी ऊसाच्या उत्पादकाकडून किंवा ऊस उत्पादकांची सहकारी संस्था यांचेकडून खरेदी करेल तेंव्हा उत्पादक संबंधीत ऊस उत्पादक किंवा ऊस उत्पादकांची सहकारी संस्था यांचे मध्ये जोपर्यंत ऊस दर अदायगीबाबत लेखी करार होत नाही, अशा परिस्थितीत उत्पादक संबंधीत ऊस पुरवठादारांना ऊसाचा पुरवठा कारखान्याच्या गेटवर किंवा ऊस संकलन केंद्रावर केलेल्या तारखेपासून चौदा दिवसांच्या उशीरा नंतर 15% द.सा.द.शे. व्याज देईल. जर ही व्याजाची रक्कम ऊस उत्पादक सहकारी संस्थेच्या मार्फत ऊस पुरवठादार शेतकऱ्यांस अदा होणार असेल तेंव्हा सदर सहकारी संस्था त्याच्यातुन नियमानुसार मान्यता असलेले प्रशासकीय शुल्क वजा करुन ऊस पुरवठादार शेतकऱ्यांच्या खात्यात व्याजाची रक्कम जमा करेल.

कलम ३(८) ऊस बिलाचे पेमेंट व विलंबावधीसाठी व्याज संबधीत ऊस पुरवठादारांना अदा करणेकरीता संबधीत जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांना ऊस बिलाची प्रलंबित रक्कम आणि

त्यावरील होणारे विलंबावधीचे व्याजाची संबधीत कारखान्याकडून जमिन महसुलाची थकबाकी समजून महसुली वसुली प्रमाणपत्र बाबत आदेश निर्गमित करतील.

कलम ३(९) कलम ८ चे तरतुदीनुसार निर्गमित केलेल्या आदेशाप्रमाणे संबधीत जिल्हाधिकारी नमुद ऊसबिलाची प्रलंबित रक्कम संबधीत कारखान्याकडून जमिन महसुलाची थकबाकी समजून वसुलीची कार्यवाही करतील.

कलम ३(१०) जिल्हाधिकारी यांनी संबधीत कारखान्याकडून कलम ८ व ९ प्रमाणे वसुलीची कार्यवाही केल्यानंतर जिल्हाधिकारी यांनी संबधीत ऊस पुरवठादारांना किंवा ऊस उत्पादकांचे सहकारी संस्थामार्फत त्यांचे मागणी नोंदविल्याबाबत सार्वजनिक सुचनापत्राद्वारे ३० दिवसांच्या आत संबंधितांना कळवेल.

कलम ३(११) आदेशातील कलम ११ प्रमाणे कारवाई करुन वसुलीची रक्कम प्रमाणपत्रातील रक्कमेपेक्षा कमी वसूल झाल्यास संबंधित प्राधिकृत जिल्हाधिकारी ऊस पुरवठादारांचे विशिष्ट प्रमाणात ऊस बिलाची रक्कम अदा करील.

कलम ३(१२) प्राधिकृत जिल्हाधिकारी यांनी कलम ८ चे प्रमाणपत्रातील ऊस बिल रक्कम व त्यावरील व्याजाची रक्कम पूर्णत: वसूल होईपर्यंत जमिन महसुलाची थकबाकी समजून कार्यवाही करुन संबंधित ऊस पुरवठादाराचे देय रक्कम अदा केली पाहिजे.

------ooo------

प्रकरण-२

जमीन महसूल संहिता १९६६ मधील लागू असलेल्या महत्वाच्या तरतुदी

(अ) जमीन महसूल संहिता १९६६ :-

कलम १६८ जमीन महसूलाचे दायित्व :

(१) (अ) बिनदुमाला जमिनीच्या बाबतीत, भोगवटादार किंवा राज्य शासनाचा पट्टेदार,

(ब) दुमाला जमिनीच्या बाबतीत, वरिष्ठ धारक, आणि

(क) कुळाच्या भोगवट्यातील जमिनीच्या बाबतीत, जर संबंधीत कुळवहीवाट कायद्यान्वये त्याबाबत जमीन महसूल देण्यास असे कूळ जबाबदार असेल तर ते कूळ, जमीन महसुलाची सर्व थकबाकी धरून, त्या जमिनीच्या बाबतीत देय असलेला जमीन महसूल देण्यासाठी राज्य शासनास प्रथमत: जबाबदार असेल. या कलमान्वये प्रथमत: जबाबदार असणारे संयुक्त भोगवटादार आणि संयुक्त धारक हे संयुक्तपणे आणि पृथकपणे जबाबदार असतील.

(२) या कलमान्वये प्रथमत: जबाबदार असलेल्या कोणत्याही व्यक्तीने कसूर केल्यास ती जमीन ताब्यात असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीकडून वर निर्दिष्ट केलेली थकबाकी धरून जमीन महसूल वसूल करण्यात येईल : परंतु, अशी व्यक्ती कूळ असेल, तर तिच्याकडून वसूल करावयाची रक्कम, ज्या वर्षात वसुली केली जात असेल त्या वर्षाच्या मागणीपेक्षा अधिक असणार नाही : परंतु आणखी असे की, जेव्हा या कलमान्वये जमीन महसूल देण्यास जी व्यक्ती प्रथमत: जबाबदार असेल अशा अशा व्यक्तीस तिने योग्य रीतीने जी कोणतीही रक्कम दिली असती अशी रक्कम म्हणून अशा व्यक्तीच्या खाती जमेस दाखवण्यात येईल आणि ती व्यक्ती प्रथमत: जबाबदार असेल अशा व्यक्तीशी तिचा जो हिशेब असेल त्यामध्ये तिच्याकडून वसूल करण्यात आलेली ही जमेच्या बाजूस दाखविली जाण्याचा तिला हक्क असेल.

कलम १६९. राज्य शासनाला येणे असलेल्या रकमांना इतर सर्व मागण्यांवर प्राधान्य देणे :

(१) जमिनीच्या संबंधात देय झालेल्या जमीन महसुलाची थकबाकी त्या जमिनीवरील आणि तिच्या प्रत्येक भागावरील सर्वश्रेष्ठ भार राहील आणि कोणत्याही जमिनीच्या किंवा तिच्या धारकाच्या कोणत्याही इतर कर्जावर, मागणीवर किंवा कोणत्याही मागणी हक्कावर-मग ते गहाण न्यायालयीन हुकूमनामा अंमलबजावणी किंवा जप्ती यांच्या संबंधातील असोत वा अन्यथा इतर कोणत्याही प्रकारचे असोत-त्यास प्राधान्य मिळेल.

(२) जमीन महसुलाच्या थकबाकीखेरीज इतर, परंतु या प्रकरणाच्या तरतुदींन्वये महसुली मागणी म्हणून वसूल करता येईल अशा कोणत्याही पैशासंबंधीच्या राज्य शासनाच्या मागणीस, कोणत्याही जमिनीच्या किंवा तिच्या धारकाच्या सर्व असंरक्षित मागण्यांवर अग्रक्रम देण्यात येईल.

कलम १७३. "थकबाकी" विषयी "कसूर करणारी व्यक्ती" :

देय झालेला आणि विहित केलेल्या दिनांकास किंवा त्यापूर्वी न दिलेला कोणताही जमीन महसूल, त्या दिनांकापासून थकबाकी होईल आणि **कलम १६८** च्या तरतुदींन्वये किंवा अन्यथा तो देण्यास जबाबदार असलेल्या व्यक्ती कसूर करणाऱ्या व्यक्ती ठरतील.

कलम १७५. प्रमाणित केलेले हिशोब हे थकबाकी विषयीचा पुरावा असणे :

(१) जिल्हाधिकाऱ्याने किंवा सहायक किंवा उप-जिल्हाधिकाऱ्याने किंवा तहसीलदाराने प्रमाणित केलेले लेख्याचे विवरणपत्र या प्रकरणाच्या प्रयोजनासाठी देय असलेल्या जमीन महसुलाच्या रकमेची थकबाकी असल्याबद्दलचा आणि ज्या व्यक्तीने कसूर केला असेल अशा व्यक्तीसंबंधीचा निर्णायक पुरावा असेल.

(२) लेख्याचे असे प्रमाणित विवरणपत्र मिळाल्यानंतर, एखाद्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने किंवा सहायक किंवा उप-जिल्हाधिकाऱ्याने किंवा तहसीलदाराने इतर कोणत्याही जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याच्या मागण्या जणू काही त्या मागण्या त्याच्या स्वतःच्या जिल्ह्यामध्ये उत्पन्न झाल्या असल्याप्रमाणे याप्रकरणाच्या तरतुदींन्वये त्या

वसूल करण्यासाठी कार्यवाही करणे कायदेशीर असेल.

(३) मुंबईच्या जिल्हाधिकाऱ्याने प्रमाणित केलेल्या अशाच लेख्यांच्या विवरणपत्रावरून, जणू काही ते एखाद्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने या संहितेअन्वये प्रमाणित केले असल्याप्रमाणे, कार्यवाही करता येईल.

कलम १७६. थकबाकीच्या वसूलीची कार्यपध्दती :

जमीन महसुलाची थकबाकी पुढीलपैकी कोणत्याही एका किंवा अधिक कार्यपद्धतीनुसार वसूल करता येईल:

(अ) कसूर करणाऱ्या व्यक्तीवर **कलम १७८**अन्वये मागणीची लेखी नोटीस बजावून;

(ब) ज्या भोगवट्याच्या किंवा धारण केलेल्या दुमाला जमिनीच्या संबंधाने थकबाकी येणे असेल त्या भोगवट्याचे किंवा त्या धारण केलेल्या दुमाला जमिनीचे **कलम १७९** अन्वये समपहरण करून ;

(क) कसूर करणाऱ्या व्यक्तीची जंगम मालमत्ता **कलम १८०** अन्वये अटकावून आणि तिची विक्री करून ;

(ड) कसूर करणाऱ्या व्यक्तीची स्थावर मालमत्ता **कलम १८१** अन्वये जप्त करून आणि तिची विक्री करून ;

(इ) कसूर करणाऱ्या व्यक्तीची स्थावर मालमत्ता **कलम १८२** अन्वये जप्त करून ;

(फ) कसूर करणाऱ्या व्यक्तीस **कलम १८३ आणि १८४** अन्वये अटक करून व तिला कैदेत ठेवून ;

(ग) धारण केलेल्या दुमाला जमिनी, संपूर्ण गावे किंवा गावांचे भाग मिळून झालेले असतील त्याबाबतीत **कलम १८५ ते १९०** (दोन्ही धरून) अन्वये उक्त गावे किंवा गावांचे हिस्से जप्त करून.

परंतु, खंड (क), (ड) आणि (इ) यांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कार्यपद्धतीनुसार पुढील गोष्टींची जप्ती आणि विक्री करता येणार नाही :-

(एक) कसूर करणाऱ्या व्यक्तीचे, तिच्या पत्नीचे व मुलांचे जरूरीचे वापरण्याचे कपडे-लत्ते, स्वयंपाकाची भांडी आणि अंथरूण-पांघरूण आणि खाटा आणि धार्मिक रुढीप्रमाणे कोणत्याही स्त्रीने अंगावर काढू नयेत असे तिचे वैयक्तिक दागिने ;

(दोन) कारागिरांची हत्यारे, आणि कसूर करणारी व्यक्ती जर शेतकरी असेल तर यांत्रिक शक्तीने चालणाऱ्या अवजाराव्यतिरिक्त, शेती करण्याची त्याची अवजारे आणि जिल्हाधिकाऱ्याच्या मते शेतकरी म्हणून आपला चरितार्थ चालावा यासाठी त्यास आवश्यक असतील अशी गुरे व बी-बीयाणे, आणि पुढील हंगामापर्यंत जमिनींची यथोचित मशागत करण्यासाठी आणि धारकाच्या व त्याच्या कुटुंबाच्या निर्वाहासाठी तरतूद करण्याकरिता जिल्हाधिकाऱ्याच्या मते शेतीच्या उत्पन्नाचा जो भाग असेल असा भाग ;

(तीन) फक्त धार्मिक देणग्यांच्या उपयोगासाठी राखून ठेवलेल्या वस्तू ;

(चार) शेतकऱ्यांच्या मालकीची आणि त्यांच्या भोगवट्यात असलेली घरे आणि इतर इमारती (त्यांचे सामान व त्यांची जागा आणि त्यांना लागून असलेली व त्यांच्या उपभोगात आवश्यक असलेली जमीन, यांसह).

कलम १७८. मागणीची नोटीस केंव्हा देता येईल. :

(१) मागणीची नोटीस, ज्या दिनांकास थकबाकी देणे होईल त्या दिनांकाच्या दुसऱ्या दिवशी किंवा त्यानंतरच्या दिवशी देता येईल.

(२) आयुक्तास अशा नोटिसा देण्यासाठी वेळोवेळी आदेश देता येतील, आणि तो, राज्य शासनाच्या मंजुरीने, कसूर करणाऱ्या व्यक्तीकडून महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करावयाचा खर्च ठरविल आणि अशा नोटिसा कोणत्या अधिकाऱ्यांनी दिल्या पाहिजेत याबाबत निदेश देईल.

कलम १७९. ज्या वहिवाटींबाबत किंवा धारण केलेल्या दुमाला जमिनींबाबत थकबाकी येणे असेल त्या वहिवाटी किंवा धारण केलेली दुमाला जमीन जप्त करता येईल. —

जिल्हाधिकाऱ्यास, ज्या वहिवाटीबाबत किंवा धारण केलेल्या दुमाला जमिनीबाबत जमीन महसुलाची थकबाकी येणे असेल अशा वहिवाटी किंवा धारण केलेली दुमाला जमीन सरकारजमा केल्याचे जाहीर करता येईल आणि या बाबतीत केलेल्या नियमांना अधीन राहून, त्या वहिवाटीची किंवा जमिनीची कलम ७२ किंवा ७३ याच्या तरतुदींअन्वये विक्री करता येईल किंवा अन्यथा त्यांचा विनियोग करता येईल आणि त्याचे उत्पन्न आल्यास ते उत्पन्न कसूर करणाऱ्या व्यक्तीच्या खाती जमा करता येईल :

परंतु, जिल्हाधिकारी अशी कोणतीही वहिवाटीची किंवा धारण केलेली दुमाला जमीन —

अ) सरकारजमा करण्यापूर्वी, स्थावर मालमत्तेच्या विक्रीसंबंधी कलम १९२ व १९३ या

अन्वये तरतूद केलेल्या रीतीने त्याने उदघोषणा केल्याशिवाय आणि घोषणेच्या इराद्याच्या लेखी नोटिसा काढल्याशिवाय; आणि

(ब) कलम १९३ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे उक्त नोटिसांपैकी कोणतीही नोटीस उशिरात उशिरा ज्या दिनांकास चिकटविण्यात आली असेल त्या दिनांकापासून निदान पंधरा दिवसांची मुदत संपेपर्यंत; त्या वहिवाटी व धारण केलेली दुमाला जमीन सरकारजमा केल्याचे जाहीर करणार नाही.

कलम १८०. कसूर करणाऱ्या व्यक्तीची जंगम मालमत्ता अटकावणे व तिची विक्री :

(१) जिल्हाधिकाऱ्यास, कसूर करणा-या व्यक्तींची जंगम मालमत्ता अटकाविण्याची व तिची विक्री करण्याची व्यवस्था करता येईल.

(२) राज्य शासनाच्या आदेशान्वये जिल्हाधिकारी वेळोवेळी निदेश देईल अशा अधिकाऱ्यांकडून किंवा अधिकाऱ्यांच्या वर्गाकडून अशी मालमत्ता अटकावण्यात येईल.

कलम १८१. कसूर करणाऱ्या व्यक्तींच्या स्थावर मालमत्तेची विक्री. :

ज्या जमिनीबाबत थकबाकी येणे असेल अशा जमिनीखेरीज इतर कोणत्याही स्थावरमालमत्तेतील, कसूर करणाऱ्या व्यक्तींचा (अनुसूचित जमातीची नसलेली व्यक्ती) हक्क, मालकी हक्क व हितसंबंध यांची जप्ती व विक्रीसुद्धा जिल्हाधिकाऱ्यास करविता येईल.

कलम १८२. कसूर करणाऱ्या व्यक्तींची स्थावर मालमत्ता जप्त करण्याचा आणि ती व्यवस्थे खाली आणण्याचा अधिकार

(१) थकबाकीच्या वसूलीसंबंधीच्या पूर्ववर्ती उपबंधांन्वये निर्दीष्ट केलेल्या कार्यपध्दतीपैकी कोणत्याही कार्यपद्धती स्वीकारणे इष्ट आहे असे जिल्हाधिका-यास वाटत असेल तर, तो, स्थावर मालमत्ता अनुसूचित जमातीमधील व्यक्तीच्या मालकीची असेल त्या बाबतीत, कसूर करणाऱ्या व्यक्तींची स्थावर मालमत्ता जप्त करायला लावील आणि ती त्याच्या स्वत:च्या किंवा त्या प्रयोजनासाठी त्यास नियुक्त करता येईल अशा कोणत्याही अभिकर्त्याच्या व्यवस्थेखाली आणून घेईल आणि इतर कोणत्याही बाबतीत त्यास तसे करवून घेता येईल.

(२) जिल्हाधिकाऱ्यास किंवा अशा रीतीने नियुक्त केलेल्या अभिकर्त्यास, जप्त केलेल्या जमिनींची व्यवस्था पाहण्याचा आणि जिल्हाधिकारी कसूर करणाऱ्या व्यक्तीकडे त्या जमिनीची

व्यवस्था परत देईपर्यंत त्या जमीनींपासून मिळणारा सर्व खंड किंवा नफा स्वीकारण्याचा हक्क असेल.

(३) जप्त केलेल्या जमिनीच्या उत्पन्नातून चालू महसूलाची रक्कम धरून अशा जप्तीचा आणि व्यवस्थेचा खर्च वजा जाता शिल्लक राहिलेल्या सर्व नफ्यांचा विनियोग अशा जमिनींच्या संबंधात येणे असलेल्या थकबाकीची रक्कम फेडण्याकडे करण्यात येईल.

(४) अशा रीतीने जप्त करण्यात आलेली जमीन जप्तीतून मुक्त करण्यासाठी व कसूर करणाऱ्या व्यक्तीकडे परत करण्यासाठी अशा जप्तीच्या दिनांकापासून बारा वर्षांच्या आत कोणत्याही वेळी, कसूर करणाऱ्या व्यक्तीने जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज केल्यानंतर-----

(अ) ज्यावेळी असा अर्ज केला असेल त्यावेळी थकबाकीची फेड करण्यात आली आहे असे आढळून आले असेल; किंवा

(ब) तिच्याकडून अद्याप येणे असलेली बाकी असल्यास, जर कसूर करणारी व्यक्ती ती देण्यास तयार असेल आणि जिल्हाधिकारी त्या बाबतीत विनिर्दिष्ट करील अशा मुदतीत ती रक्कम ती देईल तर; अशा रीतीने जप्त केलेली जमीन, जप्तीतून मुक्त करण्यात येईल व ती कसूर करणाऱ्या व्यक्तीस परत देण्यात येईल.

(५) अशी जमीन परत मिळविण्यासाठी **१२ वर्षांच्या** आत अर्ज करण्यात आला नसेल किंवा असा अर्ज करण्यात आल्यानंतर, कसूर करणाऱ्या व्यक्तीने तिच्याकडून अद्याप येणे असलेली बाकी असल्यास, अशी बाकी याबाबतीत जिल्हाधिकारी विनिर्दिष्ट करील अशा मुदतीत देण्यात कसूर केली असेल तर, जिल्हाधिकाऱ्यास अशी जमीन जप्त करण्यापूर्वी निर्माण केलेल्या भारांनी बाध न आणता, कसूर करणाऱ्या व्यक्तीचे त्या जमिनीतील अधिकार, हक्क आणि हितसंबंध विकता येतील; आणि जिल्हाधिकारी, विक्रीच्या उत्पन्नातून राज्य शासनास येणे असलेली व विक्रीबाबतच्या खर्चाची वजा करून ते कसूर करणाऱ्या व्यक्तीकडे सुपूर्द करील.

[परंतु, पोट-कलम (५) अन्वये, जिल्हाधिकाऱ्याकडून अशा जमिनीतील, कसूर करणाऱ्या व्यक्तीचा अधिकार, हक्क् आणि हितसंबंध विकण्यापूर्वी, जिल्हाधिकारी, कसूर करणाऱ्या व्यक्तीस किंवा तिच्या कायदेशीर वारसास, नोटीस पाठवून, जमीन परत मिळविण्याबाबतची तिची इच्छा असल्याची खात्री करुन घेईल; आणि जर कसूर करणाऱ्या व्यक्तीने किंवा तिच्या कायदेशीर वारसाने अशी जमीन परत मिळविण्याबाबतची आपली इच्छा असल्याचे दर्शविले असेल तर, आणि या संदर्भात पाठविण्यात आलेल्या नोटीशीमध्ये जिल्हाधिकाऱ्याने विनिर्दिष्ट केला असेल इतक्या कालावधीत, जो नव्वद दिवसांपेक्षा कमी नसेल,

पुढील रकमा प्रदान केल्या असतील तर, उक्त जमीन जप्तीतून मुक्त करण्यात येईल आणि कसूर करणाऱ्या व्यक्तीस किंवा तिच्या कायदेशीर वारसास परत देण्यात येईल :-

(एक) शासनाच्या प्रचलित आदेशांनुसार, जमीन महसुलाची थकबाकी आणि त्यावर आकारणीयोग्य व्याज यापोटी शासनाला देय असणारी अदत्त देणी;

(दोन) जिल्हाधिकाऱ्याने उक्त जमीन जप्त केल्यानंतर देखील जेव्हा अशा जमिनीचा अनधिकृत ताबा कसूर करणाऱ्या व्यक्तीकडे असेल तेव्हा, अशा कसूर करणाऱ्या व्यक्तीकडे ज्या कालावधीत अशा जमिनीचा अनधिकृत ताबा असेल त्या कालावधीकरिता, विहित करण्यात येईल इतका वार्षिक खंड जो अशा जमिनीच्या बाजारमूल्याच्या एक टक्क्यापेक्षा अधिक नसेल, आणि वेगवेगळ्या क्षेत्रांमधील जमिनीकरिता व जमिनीच्या वेगवेगळ्या वापराकरिता, वेगवेगळा वार्षिक खंड विहित करता येईल; आणि

(तीन) विहित करण्यात येईल इतकी शास्तीची रक्कम, जी चालू वर्षाकरिता, अशा जमिनीच्या बाजारमूल्याच्या पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक नसेल, आणि वेगवेगळ्या क्षेत्रांमधील जमिनीकरिता व जमिनीच्या वेगवेगळ्या वापराकरिता वेगवेगळी शास्तीची रक्कम विहित करता येईल.

कलम १८३. कसूर करणाऱ्या व्यक्तीस अटक करणे आणि स्थानबध्द करणे :

(१) कोणतीही थकबाकी देय झाल्यानंतर कोणत्याही वेळी, (ज्याच्याकडून त्याचा भोगवाट्याच्या संबंधात अशी थकबाकी येणे असेल असा शेतकरी नसेल अशा) कसूर करणा-या व्यक्तीस अटक करता येईल किंवा तिला जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा तहसिलदाराच्या कार्यालयातील अभिरक्षेत तिने शास्तीची रक्कम किंवा व्याजाची रक्कम धरून देणे असलेला महसूल आणि तिला अटक करण्याचा आणि मागणीची नोटीस बजावण्याचा खर्च आणि स्थानबद्धतेच्या मुदतीत तिच्या निर्वाहासाठी झालेला खर्च लवकरात लवकर देईपर्यंत, दहा दिवसापर्यंत स्थानबद्ध ठेवता येईल: परंत, कसूर हेतुपुरस्सर करण्यात आली असल्याशिवाय आणि कसूर करणाऱ्या व्यक्तीस तिच्या अटके विरूद्ध कारण दाखविण्याची संधी दिल्याशिवाय अशी कोणतीही अटक करण्यात येणार नाही.

(२) दहा दिवसांची मुदत संपल्यानंतर कसूर करणाऱ्या व्यक्तीने जी रक्कम देणे असेल ती रक्कम तीने दिली नाही तर, किंवा **१० दिवसांच्या** आत कोणत्याही दिवशी जर जिल्हाधिकाऱ्यास योग्य वाटेल तर, अनुसूची "अ" मधील नमुन्यातील अधिपत्राद्वारे जिल्ह्याच्या दिवाणी तुरुंगात तिला कैदेत ठेवण्यासाठी पाठविता येईल : परंतु कोणत्याही कसूर करणाऱ्या व्यक्तीस तिच्याकडून येणे असलेल्या महसुलाच्या थकबाकीच्या रकमेइतक्या कर्जाबद्दल दिवाणी न्यायालयाच्या हुकुमनाम्याच्या अंमलबाजावणीच्या बाबतीत कायद्यान्वये जी मुदत मर्यादीत करण्यात आली असेल त्या मुदतीपेक्षा अधिक मुदतीपर्यंत कैदेमध्ये अटकावून ठेवण्यात येणार नाही.

कलम १८४. अटक करण्याच्या अधिकाराचा वापर कोणी करावयाचा :

कलम १८३ अन्वये प्रदान केलेल्या अटक करण्याच्या अधिकाराचा, कोणत्याही अधिकाऱ्यांनी किंवा कोणत्या वर्गाच्या अधिकाऱ्यांनी वापर करावयाचा हे, राज्य शासनास, वेळोवेळी जाहीर करता येईल तसेच, त्यास अटके बाबतचा खर्च आणि स्थानबद्ध केलेल्या किंवा कैद केलेल्या कोणत्याही कसूर करणाऱ्या व्यक्तीस राज्य शासनाने द्यावयाची निर्वाहाची रक्कम ठरविता येईल.

कलम १८८. शिल्लक असलेल्या नफ्यांचा विनियोग :

जप्त केलेल्या जमिनीच्या उत्पन्नातून चालू महसुलाचा भरणा आणि जर **कलम १८७** च्या तरतुदींअन्वये महसुली मोजणी सुरू करण्यात आली असेल तर ती सुरू करण्याचा खर्च धरून अशी जप्ती व व्यवस्था याबद्दलचा खर्च वजा जाता शिल्लक राहिलेल्या सर्व नफ्यांचा विनियोग उक्त थकबाकीची रक्कम फेडण्यासाठी करण्यात येईल.

कलम १९१. परंतु तारण दिल्यानंतर सर्व कार्यवाह्या थोपविणे :

(१) अभिरक्षेत किंवा कैदेत ठेवलेल्या कोणत्याही कसूर करणाऱ्या व्यक्तींने जिल्हाधिकाऱ्यांपुढे किंवा उक्त कारणासाठी जिल्हाधिकाऱ्याने नामनिर्देशित केलेल्या इतर व्यक्तीपुढे किंवा कसूर करणारी व्यक्ती जर तुरुंगात असेल तर अशा तुरूंगाच्या प्रभारी अधिकाऱ्यापुढे, जिल्हाधिकाऱ्याचे किंवा अशा इतर व्यक्तीचे किंवा अधिकाऱ्याचे समाधान होईल असे अनुसुची-ब मधील नमुन्यातील तारण दिल्यास अशा कसूर करणाऱ्या व्यक्तीस ताबडतोब सोडून देण्यात येईल आणि वसुलीच्या सर्व कार्यवाह्या कोणत्याही वेळी थोपविण्यात येतील.

(२) प्रकरणान्वये जिच्या विरूद्ध कार्यवाही करण्यात आली असेल अशा कोणत्याही व्यक्तीस मागणी केलेली रक्कम निषेध व्यक्त करून अशी कार्यवाही करणाऱ्या अधिकाऱ्यास देता येईल आणि अशा प्रकारे रक्कम दिल्यानंतर त्या कार्यवाह्या थोपविण्यात येतील.

कलम १९२. विक्री करण्याच्या वेळची कार्यपध्दती :

(१) या प्रकरणाच्या तरतुदींअन्वये जंगम किंवा स्थावर मालमत्तेच्या विक्रीबाबत आदेश देण्यात आला असेल तेव्हा, जिल्हाधिकारी, विक्रीची वेळ व जागा विनिर्दिष्ट करणारी आणि जंगम मालमत्तेच्या बाबतीत, ती विक्री कायम करण्याच्या अधीन आहे किंवा नाही याविषयीची आणि राज्य शासनास महसूल देणारी जमीन विकावयाची असेल तेव्हा तिच्यावर आकारलेला महसूल व त्यास आवश्यक वाटेल अशा इतर कोणताही तपशील देणारी विहित नमुन्यातील व मराठी भाषांतर सोबत असलेली उद्घोषणा करील.

(२) जर विक्री स्थावर मालमत्तेची असेल तर अशी उद्घोषणा तालुक्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी आणि अशी स्थावर मालमत्ता ज्या गावात असेल त्या गावात दवंडी पिटवून करण्यात येईल; आणि जर विक्री जंगम मालमत्तेची असेल तर अशी मालमत्ता ज्या गावात जप्त करण्यात आली असेल त्या गावात आणि जिल्हाधिकारी निदेश देईल अशा इतर ठिकाणी ती उद्घोषणा करण्यात येईल.

(३) या कलमान्वये केलेली उद्घोषणा ही कोणत्याही धारण जमिनीच्या विक्रीच्यासंबंधी असेल तेव्हा तिची एक प्रत, धारण जमीन ज्या क्षेत्रात असेल त्या क्षेत्रात काम करणाऱ्या सहकारी बँकेला किंवा भू-विकास बँकेला किंवा ज्या दोन्ही बँकांना पाठविण्यात येईल.

कलम १९३. विक्रींची अधिसूचना :

(१) ज्या स्थावर मालमत्तेची विक्री करण्याचा इरादा असेल त्या मालमत्तेच्या विक्रीची आणि विक्रीची वेळ व जागा याबद्दलची, लेखी नोटीस पुढील प्रत्येक ठिकाणी लावण्यात येईल :----

(अ) जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याचे कार्यालय ;

(ब) स्थावर मालमत्ता ज्या तालुक्यात असेल त्या तालुक्याच्या तहसीलदाराचे कार्यालय;

(क) ती ज्या गावात असलेल्या त्या गावातील चावडी किंवा इतर कोणतीही सार्वजनिक इमारत; आणि

(ड) कसूर करणाऱ्या व्यक्तीचे राहण्याचे ठिकाण.

(२) जंगम मालमत्तेच्या बाबतीत अशी लेखी नोटीस तहसिलदाराच्या कार्यालयात आणि अशी मालमत्ता ज्या गावात जप्त करण्यात आली होती त्या गावातील चावडीत किंवा कोणत्याही इतर सार्वजनिक इमारतीत लावण्यात येईल.

(३) कोणत्याही विक्रीची नोटीस ----मग ती जंगम अथवा स्थावर मालमत्तेची असो --- जिल्हाधिकाऱ्यास, त्यास योग्य वाटेल अशा इतर कोणत्याही रीतीने, प्रसिद्ध करता येईल.

(४) या कलमामध्ये उल्लेख करण्यात आलेली नोटीस विहित करण्यात येईल अशा नमुन्यात असेल.

कलम १९४. विक्री कोणी करावयाची; विक्रीची वेळ इत्यादी :

(१) जिल्हाधिकारी निदेश देईल अशा व्यक्ती लिलावाने विक्री करतील.

(२) अशी कोणतीही विक्री रविवारी किंवा राज्य शासनाने मान्यता दिलेल्या इतर सार्वत्रिक सुट्टीच्या दिवशी किंवा **कलम १९३** अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, दक्त नोटीसांपैकी कोणतीही नोटीस ज्या शेवटच्या दिवशी लावली असेल त्या दिवसापासून, स्थावर मालमत्तेच्या बाबतीत कमीत कमी **३० दिवसांची** मुदत किंवा जंगम मालमत्तेच्या बाबतीत **७** दिवसांची मुदत संपेपर्यंत करण्यात येणार नाही.

कलम १९५. विक्री तहकुब करणे :

कोणत्याही पुरेशा कारणास्तव विक्री वेळोवेळी तहकूब करता येईल. परंतु **३० दिवसांपेक्षा** अधिक मुदतीसाठी विक्री तहकूब करण्यात आली असेल तेव्हा, नवीन उद्‌घोषणा करण्यात येईल आणि नवीन नोटीस देण्यात येईल. मात्र कसूर करणाऱ्या व्यक्तीने संमती दिल्यास अशी नवीन उद्‌घोषणा करण्याची किंवा नवीन नोटीस देण्याची आवश्यकता नाही.

कलम १९६. नाशवंत वस्तूंची विक्री :

कलमे १९२, १९३, १९४ आणि १९५ यांमधील कोणताही मजकूर नाश होणाऱ्या वस्तूंच्या विक्रीस लागू होणार नाही. अशा वस्तू या बाबतीत जिल्हाधिकाऱ्याने सर्वसामान्यपणे किंवा विशेषरीत्या वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार कोणताही विलंब न लावता लिलावाने विकण्यात येतील.

कलम १९७. विक्री केंव्हा थांबविता येईल :
कसूर करणारी व्यक्ती किंवा तिच्या वतीने कोणतीही व्यक्ती, ज्या थकबाकीच्या संबंधात मालमत्ता विकावयाची असेल ती थकबाकी आणि त्याने देणे असलेले सर्व कायदेशीर खर्च मालमत्तेची लिलावात विक्री होण्यापूर्वी कोणत्याहीवेळी देणे असलेली जमीन महसुलाची रक्कम वसूल करण्यासाठी **कलम १७०** अन्वये विहित केलेल्या कोणत्याही व्यक्तीस किंवा विक्रीचे काम चालविण्यासाठी नेमलेल्या अधिकाऱ्यास देईल किंवा **कलम १९१** अन्वये तिने तारण दिले असेल तर, अशी विक्री थांबविण्यात येईल.

कलम १९८.जंगम मालमत्तेची विक्री कायम केली जाण्यास केव्हा पात्र असेल :
नाशवंत वस्तूंची विक्री करणारा अधिकारी अशी विक्री तात्काळ अंतिमरीत्या समाप्त करील. जंगम मालमत्तेची इतर सर्व विक्री, असे विक्रीचे काम चालविणारा अधिकारी याबाबतीत जिल्हाधिकाऱ्याने सर्वसामान्यपणे किंवा विशेषरीत्या दिलेल्या आदेशामध्ये निदेश दिल्याप्रमाणे अंतिमरीत्या समाप्त करील किंवा ती कायम केली जाण्यास पात्र असेल. कायम केली जाण्यास पात्र असलेल्या विक्रीच्या बाबतीत. अशी विक्री कोणी कायम करावी त्याबद्दल जिल्हाधिकारी निदेश देईल.

कलम १९९. विक्री अंतिमरीत्या उरकण्यात आली असेल तेंव्हा जंगम मालमत्तेबद्दल रक्कम देण्याची रीत :
विक्री करणाऱ्या अधिकाऱ्याने अशी विक्री अंतिमरीत्या समाप्त केली असेल तेंव्हा हा प्रत्यके ढिगाची किंमत, विक्रीच्या वेळी किंवा त्यानंतर उक्त अधिकारी निदेश देईल त्यावेळी देण्यात येईल, आणि अशी रक्कम देण्यात कसूर केल्यास मालमत्ता ताबडतोब पुन्हा विक्रीसाठी काढण्यात येईल व तिची विक्री करण्यात येईल. खरेदीचा पैसा देण्यात आल्यानंतर विक्री करणारा अधिकारी त्याबद्दल पावती देईल, आणि **कलम २०६** अन्वये कोणताही अर्ज करण्यात आला नसेल तर, विक्रीच्या दिनांकापासून सात दिवसांची मुदत संपल्यावर विक्री सर्व व्यक्तींच्या बाबतीत कायम होईल. पण असा अर्ज करण्यात आला असेल तर तो फेटाळण्यात आल्याच्या दिनांकापासून अशी विक्री कायम होईल.

कलम २००. विक्री कायम केली जाण्यास पात्र असेल तेव्हा रक्कम देण्याची रीत:

(१) जेव्हा विक्री कायम केली जाण्यास पात्र असेल तेव्हा, खरेदीदार म्हणून जाहीर करण्यात आलेल्या पक्षकारास, त्याने बोली केलेल्या रकमेच्या **२५% रक्कम** ताबोडतोब अनामत ठेवण्यास फर्माविण्यात येईल आणि अशी रक्कम अनामत ठेवण्यात कसूर केल्यास ती मालमत्ता ताबडतोब विक्रीसाठी पुन्हा काढण्यात येईल व तिची विक्री करण्यात येईल.

(२) खरेदीदार खरेदीची पूर्ण रक्कम, त्यास विक्री कायम करण्यात आल्याचे कळविण्यात आल्यानंतर तिसऱ्या दिवसाच्या सूर्यास्तापूर्वी किंवा उक्त तिसरा दिवस रविवार किंवा इतर प्राधिकृत सुट्टीचा दिवस असेल तर अशा दिवसानंतरच्या पहिल्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सूर्यास्तापूर्वी देईल. खरेदीच्या पैशाची अशी पूर्ण रक्कम देण्यात आल्यावर खरेदीदारास त्याबद्दल पावती देण्यात येईल. आणि **कलम २०६** अन्वये कोणताही अर्ज करण्यात आला नसेल तर ती विक्री, विक्रीच्या दिनांकापासून **७ दिवसानंतर** सर्व व्यक्तींच्या बाबतीत कायम होईल. पण असा अर्ज करण्यात आला असेल तर तो फेटाळण्यात आल्याच्या दिनांकापासून अशी विक्री कायम होईल.

कलम २०१. स्थावर मालमत्तेच्या विक्रीबाबतीत खातेदाराने रक्कम अनामत ठेवणे :

स्थावर मालमत्तेच्या विक्रीच्या सर्व बाबतीत, खरेदीदार म्हणून जाहीर केलेल्या व्यक्तीस त्याने बोली केलेल्या रकमेच्या **२५% रक्कम** तात्काळ अनामत ठेवण्यास फर्मावण्यात येईल, आणि अशी रक्कम अनामत ठेवण्यात कसूर केल्यास, उक्त मालमत्ता ताबडतोब पुन्हा विक्रीसाठी काढण्यात येईल व तिची विक्री करण्यात येईल.

कलम २०२. खरेदीची रक्कम केंव्हा द्यावयाची:

खरेदीदार खरेदीची संपूर्ण रक्कम स्थावर मालमत्तेची विक्री ज्या दिनांकास झाली असेल त्या दिनांकापासून **२ महिन्यांची** मुदत संपण्यापूर्वी किंवा विक्री कायम केल्याची सूचना खरेदीदारास ज्या दिनांकास मिळाली असेल त्या दिनांकापासून **१५ दिवसांची** मुदत संपण्यापूर्वी, यांपैकी जी मुदत अगोदरची असेल त्या मुदतीपूर्वी देईल : परंतु, खरेदीची रक्कम ज्या दिवशी द्यावयाची असेल तो शेवटचा दिवस हा रविवार किंवा इतर प्राधिकृत सुट्टीचा दिवस असेल तर, अशा दिवसाच्या नंतरच्या पहिल्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवसाच्या

सूर्यास्तापूर्वी अशी रक्कम देण्यात येईल. १ सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, याच्या कलम ६ द्वारे “आणि **कलम २०६** अन्वये कोणताही अर्ज करण्यात आला नसेल तर ती विक्री, विक्रीच्या दिनांकापासून **७ दिवसानंतर** सर्व व्यक्तींच्या बाबतीत कायम होईल.”

कलम २०३. कसूर केल्यास परिणाम :

खरेदीच्या पैशाची संपूर्ण रक्कम-मग ती जंगम मालमत्तेची असो वा स्थावर मालमत्तेची असो-विहित केलेल्या मुदतीत देण्यास कसूर केल्यास अनामत ठेवलेल्या रकमेतून विक्रीचा खर्च भागविण्यात आल्यानंतर शिल्लक अनामत रक्कम राज्य सरकारकडे जमा करण्यात येईल, आणि अशा मालमत्तेची पुन्हा विक्री करण्यात येईल आणि कसूर करणाऱ्या खरेदीदाराचे त्या मालमत्तेवरील सर्व हक्क किंवा ज्या रकमेस ती त्यानंतर विकली जाईल, त्या रकमेच्या कोणत्याही हिश्श्याबाबतचे सर्व हक्क नाहीसे होतील.

कलम २०४. फेरविक्रीमुळे झालेल्या नुकसानीबद्दल खरेदीदाराची जबाबदारी :

अशा कसूर करणाऱ्या खरेदीदाराने बोली केलेल्या किंमतीपेक्षा शेवटी जी विक्री करण्यात आली असेल त्या विक्रीचे उत्पन्न कमी असले तर, त्यात जो फरक येईल तितकी रक्कम जिल्हाधिकाऱ्यास जमीन महसूलाच्या थकबाकीप्रमाणे त्याच्याकडून वसूल करता येईल.

कलम २०५. फेरविक्री करण्यापुर्वी अधिसूचना :

खरेदीचा पैसा देण्यात कसूर करण्यात आलेल्या मालमत्तेची प्रत्येक फेरविक्री ही, अशी फेरविक्री ताबडतोब करण्यात आली असेल त्याखेरीज, मूळ विक्रीसाठी विहित केलेल्या रीतीने नवीन नोटीस दिल्यानंतर करण्यात येईल.

कलम २०६. जंगम मालमत्तेची विक्री रद्द करणे :

नाशवंत वस्तूंखेरीज इतर जंगम मालमत्तेच्या विक्रीसंबंधी प्रसिद्धी करताना किंवा ती विक्री पार पाडताना काही महत्त्वाची नियमबाह्यता किंवा चूक झाल्यामुळे एखाद्या व्यक्तीस बरेच नुकसान पोहोचले आहे असे त्या व्यक्तीने (विक्रीच्या दिनांकापासून **७ दिवसांच्या** आत केलेल्या अर्जावरून) जिल्हाधिकाऱ्याचे समाधान हाईल अशा रीतीने सिद्ध केले असेल तर, तर त्या कारणास्तव अशी विक्री रद्द करता येईल.

कलम २०७. स्थावर मालमत्तेची विक्री रद्द करण्यासाठी अर्ज:

(१) स्थावर मालमत्तेच्या विक्रीच्या दिनांकापासून **३ दिवसांच्या** आत, कोणत्याही वेळी, अशा विक्रीसंबंधी प्रसिद्धी करताना किंवा ती पार पाडताना काही महत्त्वाची नियमबाह्यता किंवा चूक झाली आहे किंवा लबाडी करण्यात आली आहे या कारणावरून ती विक्री रद्द करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल; परंतु **कलमे २०८, २०९ आणि २१०** यांमध्ये अन्यथा जी तरतूद केली असेल त्या खेरीज अशा कोणत्याही नियमबाह्यतेमुळे किंवा चुकीमुळे त्याला बरेच नुकसान पोहोचले आहे असे अर्जदाराने, जिल्हाधिकाऱ्याचे समाधान होईल अशा रीतीने सिद्ध केले नसेल तर अशा कोणत्याही नियमबाह्यतेच्या किंवा चूक झाली असल्याच्या कारणास्तव कोणतीही विक्री रद्द करण्यात येणार नाही : परंतु, अनुसूचित जमातीच्या कसूरदार व्यक्तीस किंवा तिच्या वतीने कोणत्याही व्यक्तीस अशा दिनांकापासून **१८० दिवसांच्या** आत असा अर्ज करता येईल.

(२) असा अर्ज संमत झाला असेल तर, जिल्हाधिकारी विक्री रद्द करील आणि नवीन विक्रीबाबत निदेश देईल.

कलम २०८. विक्री कायम करणारा किंवा ती रद्द करणारा आदेश:

विक्रीच्या दिनांकापासून तीस दिवसांची किंवा, यथास्थिती, एकशेऐंशी दिवसांची मुदत संपल्यानंतर, **कलम २०७** मध्ये नमूद करण्यात आल्याप्रमाणे असा कोणताही अर्ज करण्यात आला नसेल किंवा असा अर्ज करण्यात आला असेल परंतु, तो फेटाळण्यात आला असेल तर, जिल्हाधिकारी विक्री कायम करणारा आदेश देईल : परंतु, असा कोणताही अर्ज करण्यात आला नसला तरीही, किंवा जो अर्ज फेटाळण्यात आला असेल अशा कोणत्याही अर्जात दिलेल्या कारणांखेरीज इतर कारणांवरून अशी विक्री रद्द केलीच पाहिजे असे त्यास सकारण वाटत असेल तर त्याच्या कारणांची लेखी नोंद केल्यानंतर, त्यास विक्री रद्द करता येईल.

कलम २०९. विशिष्ठ परिस्थितीत खरेदीदारास विक्री रद्द करण्यासाठी अर्ज करता येईल :

जी थकबाकी जमिनीवरील भार असेल अशा थकबाकीबद्दल जमीन विकण्यात आली असेल त्या खेरीज खरेदीदारास विकण्यात आलेल्या मालमत्तेत कसूर करणाऱ्या व्यक्तीचे विक्रीयोग्य हितसंबंध नव्हते या कारणावरून विक्री रद्द करण्यासाठी, विक्रीच्या दिनांकापासून **३० दिवसांच्या** मुदतीत, कोणत्याही वेळी जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल; आणि जिल्हाधिकारी योग्य ती चौकशी केल्यानंतर अशा अर्जावर त्यास योग्य वाटतील असे आदेश देईल.

कलम २१०. मालमत्तेची मालकी असणाऱ्या किंवा त्यात हितसंबंध धारण करणाऱ्या व्यक्तीने विक्री रद्द करण्यासाठी करावयाचा अर्ज :

(१) या संहितेअन्वये स्थावर मालमत्ता विकण्यात आली असेल तेव्हा, अशा विक्रीच्या पूर्वी संपादन केलेल्या मालकी हक्कामुळे अशा मालमत्तेची मालकी असलेल्या किंवा त्यात हितसंबंध धारण करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस अशा विक्रीच्या दिनांकापासून **३० दिवसांच्या** मुदतीत कोणत्याही वेळी पुढीलप्रमाणे रक्कम अनामत ठेवल्यानंतर विक्री रद्द करण्यात यावी म्हणून जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल :-

(अ) खरेदीदारास देण्यासाठी खरेदीच्या किमतीच्या शेकडा **५% इतकी रक्कम**;

(ब) ज्या रकमांच्या वसूलीसाठी विक्री करण्याचा आदेश देण्यात आला होता, अशा उद्घोषणेत विनिर्दिष्ट केलेल्या रकमांतून विक्रीच्या दिनांकापासून त्यासंबंधात देण्यात आली असेल अशी कोणतीही रक्कम वजा करून, थकबाकी देण्यासाठी रक्कम; आणि

(क) विक्रीच्या खर्चाची रक्कम: परंतु, अनुसूचित जमातीच्या अशा कोणत्याही व्यक्तीस विक्रीच्या दिनांकापासून **१८०दिवसांच्या** आत असा अर्ज करता येईल.

(२) विक्रीच्या दिनांकापासून **३० दिवसांच्या** किंवा, यथास्थिति, १८० दिवसांच्या मुदतीत अशी अनामत रक्कम ठेवण्यात आली असेल तर, जिल्हाधिकारी अशी विक्री रद्द करण्याचा आदेश देईल.

कलम २११. विक्री रद्द करण्यात आली असेल तेंव्हा अनामत रक्कम किंवा खरेदीची रक्कम परत करणे :

जेंव्हा कोणत्याही मालमत्तेची विक्री कायम करण्यात आली नसेल, किंवा ती रद्द करण्यात आली असेल तेव्हा खरेदीदारास त्याची अनामत रक्कम किंवा, यथास्थिति, त्याची खरेदीची रक्कम आणि **कलम २१०**, पोट-कलम (१) खंड (क) अन्वये अनामत ठेवलेल्या खरेदीच्या रकमेच्या **५% इतकी रक्कम** परत मिळण्याचा हक्क असेल.

कलम २१२. विक्री कायम करण्यात आल्यावर खरेदीदारास ताबा देणे :
खरेदीचे प्रमाणपत्र :

कोणत्याही भोगवट्याच्या अधिकाराची किंवा धारण केलेल्या दुमाला जमिनीची विक्री उपरोक्त रीतीने कायम केल्यानंतर जिल्हाधिकारी खरेदीदार म्हणून जाहीर केलेल्या व्यक्तीस अशा जमिनीचा ताबा देईल आणि कसूर करणा-या व्यक्तीच्या नावाऐवजी, तिचे नाव भोगवटादार किंवा जमिनधारक म्हणून भूमि-अभिलेखात दाखल केले जाण्याची व्यवस्था करील आणि प्रमाणपत्रात निर्दिष्ट केलेली जमीन तिने खरेदी केली आहे अशा आशयाचे एक प्रमाणपत्र तिला देईल.

कलम २१३. प्रमाणित खरेदीदारांवर दावा करण्यास मनाई :

विक्रीच्या वेळी प्रत्यक्ष खरेदीदार म्हणून ज्या व्यक्तीस जाहीर करण्यात आले असेल त्या व्यक्तीचे नाव प्रमाणपत्रात नमूद करण्यात येईल; आणि कराराअन्वये प्रमाणित खरेदीदाराच्या नावाचा उपयोग केला असला तरी प्रमाणित खरेदीदाराऐवजी दुसऱ्या व्यक्तीच्या वतीने खरेदी झाली आहे या कारणास्तव प्रमाणित खरेदीदाराविरुद्ध दिवाणी न्यायालयात दाखल करण्यात आलेला कोणताही दावा फेटाळण्यात येईल.

कलम २१४. विक्रीच्या उत्पन्नाचा विनियोग :

(१) या प्रकरणान्वये जंगम मालमत्तेची कोणतीही विक्री अबाधित झाली असेल, आणि स्थावर मालमत्तेची कोणतीही विक्री कायम करण्यात आली असेल तेव्हा, विक्रीच्या उत्पन्नाचा विनियोग विक्रीच्या खर्च भागविण्यासाठी आणि अशी विक्री कायम केल्याच्या दिनांकास कसूर करणाऱ्या व्यक्तीकडून येणे असेल अशी व जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करण्याजोगी असेल अशी कोणतीही

बाकी आणि जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे, कसूर करणाऱ्या व्यक्तीकडून वसूल करण्याजोगी आणि अशी विक्री कायम करण्यापूर्वी जिल्हाधिकाऱ्यास कळविलेली इतर कोणतीही रक्कम भागविण्यासाठी करण्यात येईल, आणि शिल्लक रक्कम राहिल्यास ती जिची मालमत्ता विकण्यात आली असेल अशा व्यक्तीस देण्यात येईल.

(२) राज्य शासनाच्या आदेशान्वये आयुक्त वेळोवेळी जे दर मंजूर करील व आदेश देईल अशा दरांनी व त्या आदेशानुसार विक्रीच्या खर्चाचा अंदाज करण्यात येईल.

कलम २१५.शिल्लक राहीलेली रक्कम न्यायालयाच्या आदेशाखेरीज धनकोस न देणे:
उक्त शिल्लक राहिलेली रक्कम दिवाणी न्यायालयाच्या आदेशाखेरीज ज्या व्यक्तीची मालमत्ता विकण्यात आली आहे अशा व्यक्तीच्या कोणत्याही धनकोस देय होणार नाही.

कलम २१६. नंतर देय असलेल्या जमिन महसूलाबद्दल प्रमाणित खरेदीदारच केवळ जबाबदार असणे :
कलम १६८ मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, मालकी हक्काच्या प्रमाणपत्रात, खरेदीदार म्हणून ज्या व्यक्तीचे नाव नमूद करण्यात आले असेल ती व्यक्ती, विक्रीच्या दिनांकापूर्वीच्या कोणत्याही मुदतीसाठी, उक्त जमिनीच्या संबंधात देणे असलेल्या जमीन महसुलाबाबत जबाबदार असणार नाही.

कलम २१७. खरेदीदाराचा हक्क :
या प्रकरणाच्या तरतुदींन्वये स्थावर मालमत्ता विकण्यात आली असेल आणि अशी विक्री कायम करण्यात आली असेल त्याबाबतीत विक्री कायम करण्यात येईल त्या दिनांकास नव्हे तर मालमत्ता ज्या दिनांकास विकण्यात आली असेल त्या दिनांकास ती खरेदीदाराकडे निहित झाल्याचे मानण्यात येईल.

कलम २२०. नाममात्र बोलीवर खरेदी करणे :
या प्रकरणाच्या तरतुदींअन्वये केलेल्या कोणत्याही विक्रीमध्ये कोणीही बोली बोलणारी व्यक्ती नसेल किंवा करण्यात आलेली बोली अपुरी किंवा नाममात्र असेल त्याबाबतीत,

जिल्हाधिकाऱ्याने, राज्य शासनाच्या वतीने अशी मालमत्ता त्याच्या दुय्यम अधिकाऱ्यापैकी कोणत्याही अधिकाऱ्यास असा दुय्यम अधिकारी बोली करील अशा बोलीवर खरेदी करण्यासाठी प्राधिकृत करणे कायदेशीर असेल :

परंतु अशा रीतीने खरेदी करण्यात आलेली मालमत्ता ही त्यानंतर खरेदी केल्यापासून बारा वर्षांच्या आत राज्य शासनाकडून विकली गेली तर, विक्रीपासून मिळालेल्या उत्पन्नातून पुढील रकमा वसूल करण्यात येतील आणि त्यानंतर रक्कम शिल्लक राहिल्यास ती, ज्या व्यक्तीची मालमत्ता विकण्यात आली असेल त्या व्यक्तीस देण्यात येईल :-

(अ) देणे असलेली रक्कम म्हणजेच व्याजासहित बाकी असलेली मुद्दलाची रक्कम ;

(ब) राज्य शासनाकडे जमीन असताना आणि कोणत्याही व्यक्तीने ती पट्ट्याने किंवा अन्यथा घेतली नसेल त्या कालावधीमध्ये राज्य शासनाचे महसूलविषयक कोणतेही नुकसान झाले असेल तर असे नुकसान ;

(क) लिलावातील विक्रीमध्ये झालेला प्रत्यक्ष खर्च ;

(ड) मुद्दलाच्या एक चतुर्थांश रक्कमे इतकी शास्ती :

परंतु आणखी असे की, पूर्वोक्तप्रमाणे जर तद्नंतर मालमत्ता विकण्यात आली नसेल तर, उक्त मालमत्ता मागील परंतुकामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आल्याप्रमाणेच्या रकमा कसूर करणा-या व्यक्तीन दिल्यानंतर, राज्य शासनाच्या वतीने ती खरेदी करण्यात आल्याच्या दिनांकापासून **१२ वर्षे** मुदतीचे आत कोणत्याही वेळी, उक्त कसूर करणाऱ्या व्यक्तीस परत करण्यात येईल किंवा, यथास्थिती, शासनाने ती खरेदी करण्याच्या लगतपूर्वी तिने ज्या भूधारणापद्धतीवर ती धारण केली होती त्या भूधारणापद्धतीवर तिला देण्यात येईल.

कलम २२१. या प्रकरणाच्या उपबंधान्वये वसूल करता येईल अशी रक्कम :

(१) (अ) या संहितेअन्वये किंवा त्या त्या वेळी अमलात असललेल्या जमीन महसूलासंबंधीच्या कोणत्याही अधिनियमान्वये देण्याजोगा किंवा बसविता येण्याजोगा असेल असा जमीन महसूल, खंड, उक्त खंड (क्विट रेंट), नजराणा, उत्तराधिकारी शुल्क, हस्तांतरण शुल्क आणि जप्ती, उपकर,जमिनीपासूनचे नफे, वित्तलब्धी, फी, भार, दंड, शास्ती, पाणीपट्टी, स्वामित्व धन, खर्च यांबद्दल देणे असलेल्या सर्व रकमा;

(ब) कोणताही खर्च कर, शुल्क, उपकर किंवा फी किंवा महसुलाची कोणतीही इतर बाब यांच्या मक्त्याबाबत कोणत्याही कंत्राटदाराकडून येणे असलेला सर्व पैसा आणि

असा कोणताही कंत्राटदार, त्याच्या कराराच्या अटीअन्वये ज्या आर्थिक स्वरूपाच्या शास्तीस पात्र होईल त्या सर्व विशिष्ट आर्थिक स्वरूपाच्या शास्ती ;

(क) या संहितेअन्वये किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये किंवा शासनाबरोबर केलेल्या कोणत्याही कराराद्वारे किंवा संविदेद्वारे आकारणी म्हणून किंवा महसुली मागणी म्हणून किंवा जमीन महसुलाची थकबाकी म्हणून आकारणीयोग्य असल्याचे जाहीर केलेल्या सर्व रकमा या प्रकरणाच्या पूर्वीपूर्ती तरतुदींअन्वये आकारण्यात येतील आणि या प्रकरणाच्या सर्व तरतुदी या शक्य तेथवर त्यास लागू होतील.

(२) पोट-कलम (१), खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केलेले कोणतेही शेत परत घेण्यात येईल त्या बाबतीत कोणत्याही व्यक्तीला, तिने परत मिळण्याच्या अपेक्षेसह ज्या कोणत्याही रकमा कंत्राटदाराला दिल्या असतील त्या रकमांबद्दल कोणतीही रक्कम मिळण्याचा हक्क असणार नाही.

कलम २२३. जामीनाकडून पैशाची वसूली करणे :

जी कोणतीही व्यक्ती या संहितेच्या किंवा इतर कोणत्याही अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींन्वये किंवा ज्या कोणत्याही मंजुरीअन्वये, पट्ट्यान्वये किंवा संविदेअन्वये जिच्याबद्दल जामीन दिला आहे अशी रक्कम, जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे मूळ देणेकऱ्याकडून वसूल करण्यासारखी असेल त्या मंजुरीअन्वये, पट्ट्यान्वये किंवा संविदेअन्वये, जामीन राहिले असेल अशी कलम २२१, पोट-कलम (१), खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केलेला कंत्राटदार धरून, प्रत्येक व्यक्ती तिच्या प्रतिभूति बंधपत्रातील शर्तीप्रमाणे जी रक्कम भरणा करण्यास पात्र झाली असेल ती रक्कम किंवा तिचा कोणताही भाग करण्यात कसूर करील तर, या संहितेच्या तरतुदींअन्वये, ती महसूल देण्यात कसूर करणाऱ्या व्यक्तीप्रमाणे, तिच्याविरुद्ध कारवाई केली जाण्यास पात्र ठरेल; आणि अशा व्यक्तीला या प्रकरणाच्या सर्व पूर्वगामी तरतुदी, शक्य असेल तेथवर, लागू असतील.

----- ००० -----

(ब) महाराष्ट्र जमीन महसुलाच्या वसुलीबाबत नियम, १९६७

(शासकीय अधिसूचना क्रमांक : यू.एन.एफ. २३६७-आर, दिनांक १ सप्टेंबर, १९६७)

नियम १. संक्षिप्त नांव - या नियमास 'महाराष्ट्र जमीन महसुलाच्या वसुलीबाबत नियम, १९६७' असे म्हणता येईल.

नियम ५. मागणीच्या नोटिशीचा नमुना –

(१) **कलम १७८** खाली काढावयाची नोटीस नमुना १ मध्ये असेल.

(२) मागणीच्या निरनिराळ्या नोटिसा वेगवेगळ्या कसूरदारांच्या नावे काढण्यात येतील.

नियम ६. कलम १७९ खाली करावयाची उद्‌घोषणा व काढावयाची नोटीस यांचा नमुना - कलम १७९ खाली करावयाची उद्‌घोषणा व काढावयाची नोटीस ही नमुना २ मध्ये असेल.

नियम ७. केवळ भोगवट्याची जमीन इत्यादींचा भाग जप्त करणे. - कोणत्याही भोगवट्याच्या जमिनीचा किंवा दुमाला धारण जमिनीच्या बाबतीत जमीन महसुलाची थकबाकी देय असेल त्या बाबतीत, जिल्हाधिकारी, जमीन महसुलाच्या थकबाकीबद्दल करण्यात आलेली मागणी पूर्ण करण्यासाठी, त्याच्या मते, आवश्यक असेल तेवढाच भोगवट्यातील जमिनीचा किंवा धारण जमिनीचा भाग जप्त करील.

नियम ८. विवक्षित प्रकरणांमध्ये जमीन महसुलाची थकबाकी माफ करणे. - जमीन महसुलाच्या प्रदानातील कसुरीबद्दल जप्त केलेल्या कोणत्याही जमिनीची, कलम ७२ च्या उपबंधानुसार विल्हेवाट लावण्यात आलेली नसेल अशा बाबतीत, कसूरदाराने देय असलेल्या जमीन महसुलाच्या थकबाकीची रक्कम त्याच्या विरुध्द पुढील अनिवार्य कार्यवाही न करता, सामान्यत: माफ करण्यात येईल.

नियम ९. कसूरदाराची जंगम मालमत्ता अटकावून ठेवण्याच्या अधिपत्राचा नमुना व अशारितीने (माल) अटकावून ठेवण्याची पद्धती –

(१) कलम १८० खाली कसूरदाराची जंगम मालमत्ता अटकावून ठेवण्यासाठी, जिल्हाधिकारी, त्या कलमाच्या पोटकलम (२) मध्ये निर्देश केलेल्या अधिकाऱ्याच्या नांव (ज्याचा यापुढे या नियमात "अटकावून ठेवणारा अधिकारी" असा निर्देश करण्यात आला आहे) नमुना ३ मध्ये अटकावयाचे अधिकारपत्र काढील.

(२) अटकावून ठेवणाऱ्या अधिकाऱ्याला, प्रत्यक्ष अभिग्रहणाद्वारे, कसूरदाराची जंगम मालमत्ता अटकावून ठेवता येईल व तो ती, आपल्या अभिरक्षेत किंवा कोणत्याही आपल्या दुय्यम व्यक्तीच्या अभिरक्षेत ठेवील व तो, त्याने अधिग्रहण केलेल्या मालमत्तेबद्दल जबाबदार असेल :

परंतु अभिग्रहण केलेली जंगम मालमत्ता, जलद व नैसर्गिकपणे नाश होण्याची शक्यता असेल किंवा ती अभिरक्षेत ठेवण्याचा खर्च, तिच्या मूल्याहून अधिक होण्याचा संभव असेल त्या बाबतीत, अटकावून ठेवणारा अधिकारी, जिल्हाधिकाऱ्याच्या आदेशानुसार ती तत्काळ विकण्याची व्यवस्था करील.

तसेच, अभिग्रहण केलेल्या मालमत्तेमध्ये, गुरेढोरे, शेतीची अवजारे किंवा ज्या सोयीस्करपणे हलवणे शक्य नाही अशा इतर वस्तू यांचा अंतर्भाव असेल त्या बाबतीत, अटकावून ठेवणाऱ्या अधिकाऱ्याला, ती मालमत्ता पूर्ववर्ती परंतुकान्वये विकण्याची व्यवस्था करण्यात आली नसेल तर, कसूरदाराच्या किंवा त्या मालमत्तेच्या हितसंबंध असल्याचा दावा सांगणाऱ्या इतर कोणत्याही व्यक्तीच्या सांगण्यावरुन, त्या गावा किंवा ज्या ठिकाणी ती अटकावून ठेवण्यात आली असेल त्या ठिकाणी, -

(एक) कसूरदाराच्या किंवा कोंडवाडा रक्षक, कोणताही असल्यास, त्याच्या ताब्यात ठेवता येईल, किंवा

(दोन) त्या मालमत्तेमध्ये हितसंबंध असल्याचा दावा सांगणाऱ्या व्यक्तीच्या किंवा अटकावून ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांच्या मते आदरणीय असेल व आपल्या अभिरक्षेत ती मालमत्ता ठेवण्यास जी तयार असेल अशा इतर कोणत्याही व्यक्तीच्या ताब्यात ठेवता येईल, परंतु त्यापूर्वी, अशा कसूरदाराने किंवा कोंडवाडा रक्षकाने किंवा यथास्थिती, अशा व्यक्तीने मालमत्तेच्या मूल्यापेक्षा कमी नसेल एवढ्या रकमेच्या, एक किंवा त्याहून अधिक जमिनीसह, बंधपत्र करुन दिले पाहिजे व मागणी करण्यात येईल तेव्हा अटकावून ठेवणाऱ्या अधिकाऱ्यापुढे ती मालमत्ता हजर करण्यात येईल याबाबत हमी दिली पाहिजे.

(३) अटकावून ठेवणारा अधिकारी, अटकावून ठेवलेल्या मालमत्तेची यादी तयार करील व ती मालमत्ता जिच्या अभिरक्षेत ठेवण्यात आली असेल अशा व्यक्तींची आणि शक्य असल्यास, कसूरदाराची आणि ती यादी अचूक असल्याबद्दल साक्षांकन करण्यासाठी त्याच्या मते आदरणीय असेल अशा किमान एका व्यक्तीची त्यावर सही घेईल. अटकावून ठेवलेल्या मालमत्तेमध्ये गुरेढोरे व इतर वस्तू या दोहोंचाही अंतर्भाव असेल तर गुराढोरांची एक अटकावून ठेवलेल्या मालमत्तेमध्ये गुरेढोरे व इतर वस्तू या दोहोंचाही अंतर्भाव असेल तर

गुराढोरांची एक वेगळी यादी तयार करण्यात येईल व उपरोक्त प्रमाणे ती साक्षांकित करण्यात येईल.

(४) गुरेढोरे किंवा इतर जंगम मालमत्ता कसूरदाराच्या ताब्यात नसेल त्या बाबतीत, गुराढोरांच्या चाऱ्यापाण्याचा खर्च किंवा इतर जंगम मालमत्तेच्या सुरक्षित अभिरक्षेचा खर्च, जिल्हाधिकारी सर्वसाधारणपणे किंवा विशेष आदेशाद्वारे निश्चित करील अशा दराने आकारण्यात येईल. असा झालेला खर्च, हा मालमत्तेच्या विक्री उत्पन्नावर प्रथम आकारण्यात येईल.

नियम १०. दिवाणी व्यवहार संहितेचे उपबंध लागू असणे. - दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ च्या पहिल्या अनुसूचीचा नियम क्रमांक एकवीस मधील नियम ४७ ते ५३ यांचे त्या नियमात वर्णन केलेल्या जंगम मालमत्तेच्या जप्तीसंबंधीचे उपबंध, शक्यतोवर त्या अधिनियमान्वये अटकावून ठेवलेल्या जंगम मालमत्तेच्या बाबतीत लागू होतील.

नियम ११. स्थावर मालमत्तेची जप्ती. -

(१) कलम १८१, १८२ व १८५ अन्वये करावयाची स्थावर मालमत्तेची जप्ती, कसूरदारास कोणत्याही प्रकारे मालमत्ता हस्तांतरित करण्यास किंवा तिच्यावर कोणत्याही प्रकारे भार निर्माण करण्यास व अशा हस्तांतरणापासून किंवा भारापासून कोणताही लाभ घेण्यास इतर सर्व व्यक्तींना प्रतिवेध करणारा नमुना ४ मधील आदेश जिल्हाधिकाऱ्याकडून काढण्यात येऊन, कार्यान्वित करण्यात येईल.

(२) अशा मालमत्तेमधील किंवा अशा मालमत्तेलगतच्या कोणत्याही ठिकाणी दवंडी पिटवून किंवा इतर रुढ पद्धतीने तहसीलदाराकडून किंवा नायब तहसीलदाराकडून आदेशाची उद्‌घोषणा करण्यात येईल आणि आदेशाची एक प्रत, मालमत्तेतील ठळक जागी, तसेच तलाठ्याच्या कार्यालयातील सूचना फलकावर, चिकटवण्यात येईल.

(३) आदेशाची प्रत मालमत्तेवर ज्या दिनांकाला चिकटली असेल त्या दिनांकापासून, सदभावना मूल्याबद्दल खरीददाराच्या विरुध्द व असा आदेश ज्या दिनांकाला काढला असेल त्या दिनांकापासून, कसूरदाराकडून हस्तांतरित केलेली मालमत्ता ज्यांनी घेतली आहे अशा सर्व इतर हस्तांतरितीविरुध्द आदेश अमलात येईल.

नियम १२. समपहरण केलेल्या, अटकावून ठेवलेल्या किंवा जप्त केलेल्या मालमत्तेची विक्री. -

(१) समपहरण केलेल्या, अटकावून ठेवलेल्या किंवा जप्त केलेल्या मालमत्तेची विक्री ही सामान्यपणे, मालमत्ता ज्यामध्ये असेल त्या नगरात किंवा गावात करण्यात येईल.

(२) अशा विक्रीच्या उद्‌घोषणा व लेखी नोटिसा, -

(अ) समपहरण केलेल्या मालमत्तेच्या बाबतीत, नमुना ५ मध्ये,

(ब) अटकावून ठेवलेल्या मालमत्तेच्या बाबतीत, नमुना ६ मध्ये,

(क) जप्त मालमत्तेच्या बाबतीत, नमुना ७ मध्ये काढण्यात येतील.

नियम १३. हातची किंमत निश्चित करण्यात यावी. - कोणतीही जमीन किंवा इतर मालमत्ता जाहीर लिलावाने विकण्यात येईल त्याबाबतीत हातची किंमत, जिल्हाधिकाऱ्याला योग्य वाटल्यास त्यासाठी ठरविण्यात येईल.

नियम १४. विक्रीच्या प्रमाणपत्राचे नमुने. - स्थावर मालमत्तेची विक्री कायम झाल्यावर खरीददाराला विक्रीचे प्रमाणपत्र,-

(अ) विकण्यात आलेली मालमत्ता ही समपहरण केलेली मालमत्ता असेल त्याबाबतीत नमुना ८ मध्ये,

(ब) विकण्यात आलेली मालमत्ता ही, अटकावून ठेवलेली मालमत्ता असेल त्याबाबतीत नमुना ९ मध्ये देण्यात येईल.

नियम १५. जंगम मालमत्तेची विक्री पूर्ण झाल्यावर ती मालमत्ता देणे. - कलम १९९ किंवा २०० या कलमान्वये जंगम मालमत्तेची विक्री पूर्ण होईल त्या बाबतीत, विक्री करणारा अधिकारी,

(अ) मालमत्ता प्रत्यक्ष जप्त करण्यात आली असल्यास ती खरीददाराला देईल, आणि

(ब) इतर कोणत्याही प्रकरणांमध्ये, अशी मालमत्ता खरीददाराकडे निहित करणारा आदेश करील.

नियम १६. कलम २१२ अन्वये खरीददारास ताबा देण्याची पद्धती. —

(१) विकलेली जमीन ही कसूरदाराच्या किंवा त्याच्या वतीने कोणत्याही व्यक्तीच्या किंवा जमीन जप्त केल्यावर किंवा नियम १४ अन्वये तिच्या संबंधात प्रमाणपत्र दिल्यावर,

कसूरदाराने निर्माण केलेल्या हक्कान्वये दावा सांगणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या, ताब्यात असेल त्याबाबतीत, विक्री करणाऱ्या अधिकाऱ्याने, खरीददाराने अर्ज केल्यावर, अशा खरीददाराकडे किंवा खरीददार आपल्या वतीने मालमत्ता स्वीकारण्यास नियुक्त करील अशा कोणत्याही व्यक्तीकडे, जमिनीचा ताबा देण्याचा आदेश काढील आणि आवश्यक असल्यास (जमीन), सोडून देण्यास नकार देणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला बळजबरी (जमिनीतून) काढून लावील.

(२) अशी जमीन कुळाच्या किंवा तिचा भोगवटा करण्यास पात्र असलेल्या इतर व्यक्तीच्या ताब्यात असेल त्या बाबतीत, विक्री करणारा अधिकारी, खरीददाराने अर्ज केल्यावर, नियम १४ अन्वये दिलेल्या प्रमाणपत्राची एक प्रत, जमिनीवरील एखाद्या ठळक ठिकाणी चिकटवून व कसूरदाराचे हितसंबंध खरीददाराकडे हस्तांतरित करण्यात आले आहेत, ही गोष्ट दवंडी पिटवून किंवा रुढ पद्धतीने जमीन ताब्यात असणाऱ्या व्यक्तीसमोर घोषित करुन, जमीन देण्याबद्दल आदेश देईल.

नियम १७. जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल योग्य असलेल्या रकमा वसूल करण्याची कार्यपद्धती. -

(१) शासनाच्या कोणत्याही विभागाला किंवा स्थानिक प्राधिकरणाला किंवा सहकारी संस्थेला देय असलेली कोणतीही रक्कम, कसूरदाराकडून जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसुलीयोग्य असेल त्या बाबतीत, असा विभाग, स्थानिक प्राधिकरण किंवा यथास्थिती सहकारी संस्था, यास, कसूरदार ज्या तालुक्यात राहत असेल किंवा ज्या तालुक्यात त्याची मालमत्ता, असेल त्या तालुक्याच्या तहसीलदाराकडे रकमेच्या वसुलीसाठी लेखी मागणी पाठविता येईल.

(२) अशा मागणीत पुढील तपशील अंतर्भूत असेल -

(अ) कसूरदारांचे पूर्ण नांव व पत्ता,

(ब) वसूल करावयाची रक्कम,

(क) जमीन महसुलाची थकबाकी म्हणून विधीच्या ज्या उपबंधान्वये रक्कम वसुलीयोग्य असेल तो उपबंध,

(ड) रक्कम वसूल करता येईल ती पद्धती प्रक्रिया,

(इ) जिच्या बाबतीत त्या प्रक्रियेचा अवलंब करता येईल ती मालमत्ता.

(३) अशी मागणी मिळाल्यावर, तहसीलदार जिची अधिनियमाचे उपबंध व हे नियम यांच्या उपबंधानुसार तिची विल्हेवाट लावतील.

नमुना १

(नियम ५ पाहा)

कसूरदारास मागणीची नोटीस

प्रति,

श्री.-----------, वडिलांचे नांव ----------, राहणार गाव -------, तालुका --------, जिल्हा -------

आपणांस याद्वारे, अशी नोटीस देण्यात येते की, यासोबतच्या विवरणपत्रात दिलेल्या तपशीलाप्रमाणे जमीन महसुलाची थकबाकी म्हणून आपणाकडून रुपये ------ इतकी रक्कम येणे असून ही नोटीस बजावल्याच्या दिनांकापासून ------ दिवसांच्या आत या नोटीसीसाठी आकारणीयोग्य असलेल्या फीच्या रु.----- इतक्या रकमेसह उक्त रक्कम भरली नाही तर अनुपालनात कसूर झाल्याबद्दल आपल्याविरुध्द महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम १७४ अन्वये उक्त थकबाकीच्या एक चतुर्थांशापेक्षा अधिक नसेल इतक्या अतिरिक्त शास्तीसह येणे असलेल्या रकमेच्या वसुलीकरीता कायद्यानुसार सक्तीची कार्यवाही करण्यात येईल.

गाव	भूमापन क्रमांक खासरा क्रमांक व उप-विभाग क्रमांक	क्षेत्र	आकारणीचा प्रकार (उदा. जमीन महसूल अकृषिक कर, किंवा वाढीव जमीन महसूल इ.	आकारणीचे वर्ष	आकारणीचा दर	आकारणीचा रक्कम (रुपये)	नोटीस आकार (रुपये)	एकूण देय असलेली रक्कम (रुपये)	नोटीस बजाविल्याची तारीख
१	२	३	४	५	६	७	८	९	१०

माझ्या सही व या कार्यालयाच्या मोहोरेनिशी दिली.

दिनांक --------------

ठिकाण -------------- महसूल अधिकाऱ्याचे पदनाम

कार्यालयाचा शिक्का.

नमुना २

(नियम ६ पाहा)

उद्‌घोषणेचा व समपहरणाच्या लेखी नोटिशीचा नमुना

ज्याअर्थी, श्री.-------------------- (वडिलांचे नांव -----------------------) राहणार, ------------- तालुका --------------- जिल्हा ------------ यांनी गाव--------तालुका -------- जिल्हा --------- यांनी गाव ---------- तालुका------, यामधील भू-मापन क्रमांक/खासरा क्रमांक/हिस्सा क्रमांक -------- क्षेत्र, ------, जमिनीच्या भोगवट्याच्या आकारणी ---------- असणाऱ्या त्यांच्या--------- जमिनीच्या भोगवट्याच्या/दुमाला धारण जमिनीच्या बाबतीत जमीन महसुलाबद्दल रु. --------- देण्यात कसूर केली आहे. आणि ज्याअर्थी, उक्त धारण जमिनीचे समपहरण करुन, उक्त रक्कम व सर्व कायदेशीर आकार व खर्च करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, याद्वारे अशी नोटीस देण्यात येत आहे की, या नोटिशीच्या तारखेपासून ------ (येथे पंधरा दिवसांपेक्षा कमी नसेल इतक्या दिवसांची संख्या नमूद करावी.) दिवस पूर्ण झाल्यावर, उक्त भोगवट्याचे/धारण जमिनीचे राज्य शासनाकडे समपहरण करण्यात येईल.

खाली विनिर्दिष्ट केलेल्या उक्त् भोगवट्याच्या / धारण जमिनीच्या भागाचे राज्य शासनाकडे समपहरण करण्यात येईल.

(समपहरणाच्या घोषणेखाली येणाऱ्या भोगवट्याच्या/धारण जमिनीच्या भागाचे वर्णन येथे द्यावे.)

माझ्या सही व कार्यालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

ठिकाणी ------------

दिनांक ----------------   महसूल अधिकाऱ्याचे पदनाम

कार्यालयाचा शिक्का.

नमुना ३

(नियम ९ पाहा)

जंगम मालमत्ता अटकावून ठेवण्याचे अधिपत्र

प्रति,

(अधिपत्राच्या अंमलबजावणीचे काम ज्याच्याकडे सोपवलेले आहे त्या व्यक्तीचे व तिच्या कार्यालयाचे नाव)

ज्याअर्थी, श्री.------------------------ (वडिलांचे नांव ----------------------) राहणार, ------------- तालुका --------------- जिल्हा ------------ यांनी गाव-------- तालुका ------- जिल्हा --------- यांनी गाव ---------- तालुका------, यामधील भू-मापन क्रमांक/खासरा क्रमांक/हिस्सा क्रमांक -------- याच्या बाबतीत जमीन महसुलाच्या बाबतीत जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसुलीयोग्य असलेल्या मागणीच्या रकमेच्या बाबतीत रुपये ---------- देण्यात कसूर केली आहे. त्याअर्थी, उक्त -------- ची जंगम मालमत्ता अटकावून ठेवण्यास आणि येणे असलेली एकूण रक्कम देण्यात आली नाही तर, ती मालमत्ता, या कार्यालयाकडून पुढील आदेश मिळेपर्यंत ताब्यात ठेवण्याबाबत आदेश देण्यात येत आहे.

हे अधिपत्र, अंमलबजावणीचा दिनांक व त्याची कोणत्याही पद्धतीने अंमलबजावणी केली ते प्रमाणित करणारे किंवा त्याची अंमलबजावणी का करण्यात आली नाही हे नमूद करणारे पृष्ठांकन करुन -------- २० ------- रोजी किंवा त्यापूर्वी, परत करण्याबाबत आपणास आणखी आदेश देण्यात येत आहेत.

माझ्या सही व कार्यालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

ठिकाणी ------------

दिनांक ----------------

महसूल अधिकाऱ्याचे पदनाम

कार्यालयाचा शिक्का.

नमुना ४

(नियम ११ पाहा)

स्थावर मालमत्तेच्या जप्तीचा आदेश

ज्याअर्थी, श्री.------------------------ (वडिलांचे नांव ----------------------) राहणार, ------------- तालुका --------------- जिल्हा ------------ यांनी, खाली तपशिलवार दिल्याप्रमाणे ----------- बद्दल त्यांच्याकडून येणे असलेले रु.---------------- देण्यास कसूर केली आहे :

(मागणीचा तपशील) -----------------

त्याअर्थी, असा आदेश देण्यात येत आहे की, उक्त ----------------- यास या कार्यालयाच्या पुढील आदेशापर्यंत त्या मालमत्तेचे, विक्रीने, देणगी म्हणून किंवा अन्यथा हस्तांतरण करण्यास प्रतिषेध असेल व तसे करण्यास प्रतिषिद्ध व अवरुद्ध करण्यात येत आहे आणि सर्व व्यक्तींना याद्वारे तशाच रितीने खरेदीने, देणगी म्हणून किंवा अन्यथा ती स्विकारण्यास प्रतिषेध असेल व तसे करण्यास प्रतिषिद्ध करण्यात येत आहे :

अनुसूची

(मालमत्तेचे वर्णन)

दिनांक --------- २० ---------- रोजी माझ्या सही व कार्यालयाच्या शिक्क्यानिशी काढण्यात आला.

----------- यांचे कार्यालय.

कार्यालयाचा शिक्का जिल्हाधिकारी

नमुना ५

(नियम १२(२) (अ) पाहा)

समपहरण केलेल्या मालमत्तेच्या विक्रीची उद्घोषणा व लेखी नोटीस

ज्याअर्थी, श्री.--------------------- वडिलांचे नांव ----------------------- राहणार ------------- तालुका --------------- जिल्हा ------------ यांच्याकडून येणे असलेल्या, खालील तक्त्यांच्या कलम (५) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या, जमीन महसुलाच्या थकबाकीच्या वसुलीसाठी, खाली विनिर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचे समपहरण करण्यात आले आहे.

त्याअर्थी, याद्वारे अशी नोटीस देण्यात येत आहे की, विक्रीसाठी यामध्ये निश्चित केलेल्या दिवसापूर्वी ----- च्या तलाठ्याला, देय रक्कम दिली नसेल तर, उक्त मालमत्ता, तिच्यावर बसविण्यात आलेल्या सर्व भारापासून व तिच्या संबंधात करण्यात आलेली सर्व अनुदाने व संविदा यांपासून मुक्त, अशी मालमत्ता ------ येथे, ------२०----- रोजी वाजता, किंवा वाजण्याच्या सुमारास, जाहीर लिलावाद्वारे विकण्यात येईल.

गाव (१)	भू-मापन क्रमांक व पोट-विभाग क्रमांक (२)	क्षेत्र (३)	आकारणी (४)	देय असलेल्या जमीन महसुलाची थकबाकी (५)
		एकर	रुपये	रुपये

टीप - (१) प्रत्येक भू-मापन क्रमांकावर किंवा पोट-विभाग क्रमांकावर देय असलेल्या जमीन महसुलाच्या थकबाकीची रक्कम, स्तंभ ९५ मध्ये स्वतंत्रपणे विनिर्दिष्ट करण्यात येईल.

(२) धारण जमिनीमध्ये, एक भू-मापन क्रमांकापेक्षा किंवा खासरा क्रमांकापेक्षा किंवा पोट-विभाग क्रमांकापेक्षा अधिक क्रमांक असतील तर, विक्री करणाऱ्या कार्यालयास, थकबाकी वसूल करण्यास आवश्यक वाटतील अशा, एका किंवा त्याहून अधिक क्रमांकाची विक्री करण्याची मुभा असेल.

माझ्या सही व कार्यालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

ठिकाणी ---------------

दिनांक ---------------- जिल्हाधिकारी

कार्यालयाचा शिक्का.

नमुना ६

(नियम १२(२) (ब) पाहा)

अटकावून ठेवलेल्या जंगम मालमत्तेच्या विक्रीची उद्घोषणा व लेखी नोटीस

ज्याअर्थी, श्री.---------------- वडिलांचे नांव ---------------राहणार ----------तालुका ----------- जिल्हा ----------- यांच्याकडून जमीन महसुलाच्या थकबाकीबद्दल/जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसुलीयोग्य असलेल्या मागणीप्रीत्यर्थ येणे असलेल्या रु.------- रकमेसाठी खालील विनिर्दिष्ट केलेली जमीन जंगम मालमत्ता अटकावून ठेवण्यात आली आहे.

त्याअर्थी, याद्वारे अशी नोटीस देण्यात येत आहे की, विक्रीकरीता यामध्ये निश्चित केलेल्या दिवसापूर्वी देय रक्कम ----- च्या तलाठ्याला देण्यात आली नाही तर, उक्त मालमत्ता ------ येथे, ------२०----- रोजी वाजता, किंवा -----वाजण्याच्या सुमारास, जाहीर लिलावाद्वारे विकण्यात येईल. अशा तऱ्हेने केलेली कोणतीही विक्री कायम होण्यास अधीन राहील/अधीन राहणार नाही.

जंगम मालमत्तेचे वर्णन (१)	वस्तूंची संख्या (२)	कलम १७६ च्या परंतुकान्वये सूट देण्यात आलेली मालमत्ता (३)

माझ्या सही व कार्यालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

ठिकाणी ---------------

दिनांक ----------------

जिल्हाधिकारी

कार्यालयाचा शिक्का.

नमुना ७

(नियम १२(२) (क) पाहा)

जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेच्या विक्रीची उद्‌घोषणा व लेखी नोटीस

ज्याअर्थी, श्री. -------------- वडिलांचे नांव --------------- राहणार ----------तालुका -------------- जिल्हा ------------ यांच्याकडून कारणासाठी येणे असलेल्या रु.-------- च्या वसुलीसाठी खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता जप्त करण्यात आलेली आहे.

त्याअर्थी, याद्वारे, अशी नोटीस देण्यात येत आहे की, यामध्ये विक्रीसाठी निश्‍चित केलेल्या तारखेपूर्वी, पूर्वोक्त रक्कम देण्यात आली नाही, तर उक्त मालमत्ता ------ येथे, दिनांक------२०----- रोजी वाजता, किंवा -----वाजण्याच्या सुमारास, जाहीर लिलावाद्वारे विकण्यात येईल.

ही विक्री उक्त मालमत्तेमधील उक्त कसूरदाराचा अधिकार, हक्क व हितसंबंध यांनाच केवळ लागू होते.

मालमत्तेचा तपशिल

वर्णन (१)	आकारणी असल्यास (२)	कोणतेही भार इत्यादी माहिती असल्यास त्याची टीप (३)

माझ्या सही व कार्यालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

ठिकाण ---------------

दिनांक ----------------

जिल्हाधिकारी

कार्यालयाचा शिक्का.

नमुना ८

(नियम १४ (अ) पाहा)

समपहरण केलेल्या स्थावर मालमत्तेच्या विक्रीचे प्रमाणपत्र

असे प्रमाणित करण्यात येत आहे की श्री.------------------------ वडिलांचे नांव ----- --------------------- राहणार ------------- तालुका --------------- जिल्हा ------------ यांना दिनांक -------- २०-------- रोजी, जाहीर लिलावाद्वारे करण्यात आलेल्या विक्रीच्या वेळी, खाली विनिर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचे खरीददार म्हणून घोषित करण्यात आले आहे आणि ही विक्री दिनांक ------- २०------- रोजी -------- यांच्याकडून यथोचितरीत्या कायम करण्यात आली आहे.

ह्या विक्रीद्वारे, मालमत्ता तिच्यावर लादलेल्या सर्व भारांपासून व खरीददाराहून इतर कोणत्याही व्यक्तीने तिच्या संबंधात दिलेली सर्व अनुदाने व केलेल्या निविदा यांच्यापासून मुक्त, खरीददाराकडे हस्तांतरित झाली आहे :

गाव (१)	भू-मापन क्रमांक व पोट-विभाग क्रमांक (२)	क्षेत्र (३)	आकारणी (४)	अभिलिखित भोगवटादाराचे किंवा मालकाचे नांव (५)	खरेदीची किंमत (६)
		एकर	रुपये		रुपये

माझ्या सही व कार्यालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

दिनांक --------२० --------

कार्यालयाचा शिक्का. महसूल अधिकाऱ्याचे पदनाम

नमुना ९

(नियम १४ (ब) पाहा)

जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेच्या विक्रीचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येत आहे की श्री.------------------ वडिलांचे नांव ---------------------- राहणार ------------- तालुका --------------- जिल्हा ------------ यांनी दिनांक -------- २०-------- रोजी, जाहीर लिलावाद्वारे करण्यात आलेल्या विक्रीच्या वेळी, खाली विनिर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचे खरीददार म्हणून घोषित करण्यात आले आहे आणि ही विक्री दिनांक ------- २०------- रोजी -------- यांच्याकडून कायम करण्यात आली आहे.

ह्या विक्रीद्वारे, उक्त मालमत्तेमधील अधिकार, हक्क व हितसंबंध श्री. ------- हस्तांतरित करण्यात आले आहे :

गाव (१)	भू-मापन क्रमांक व पोट-विभाग क्रमांक (२)	क्षेत्र (३)	आकारणी (४)	अभिलिखित भोगवटादाराचे किंवा मालकाचे नांव (५)	खरेदीची किंमत (६)
		एकर	रुपये		रुपये

माझ्या सही व कार्यालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
ठिकाण ---------
दिनांक -------------

कार्यालयाचा शिक्का. महसूल अधिकाऱ्याचे पदनाम

----- ००० -----

(क) **शासन परिपत्रक :-**

महाराष्ट्र जमीन महसूल (महसूलाच्या वसुलीबाबत नियम) १९६७ चे नियम १७ नुसार जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल योग्य असलेल्या रकमा (R.R.C.) वसूल करण्याची कार्यपध्दती.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन परिपत्रक क्र.लेप-२०११/प्र.क्र.५९(भाग-२)/टी-२
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २७.०३.२०१२

वाचा : १) शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र.आईव्ही १०७३/५४२२८/सी-१, दिनांक २२.०८.१९७४.
२) शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र.आईव्ही १०७९/१८१७२७/ल-२, दिनांक ०४.१२.१९७९.
३) शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र.आईव्ही १०७९/१८१७२७/ल-२, दिनांक २६.०५.१९८१.

पार्श्वभूमी :

महसुली वसुली प्रमाणपत्र प्रकरणांचा तालुकास्तरावर अभिलेख ठेवला जात नाही. वसुलीची कार्यवाही नियमानुसार होत नाही, बरीच वसुलीची प्रकरणे कार्यवाहीशिवाय प्रलंबित आहेत. जिल्हा स्तरावरील व तालुका स्तरावरील प्रकरणांचा मेळ घातला जात नाही. अपूर्ण माहिती असलेली प्रकरणे मूळ विभागास परत केली जात नाही. वसुलीच्या कामात अत्यंत उदासिनता आहे. ही बाब महालेखापाल, नागपूर कार्यालयाच्या तसेच शासन स्तरावरील दक्षता व निरिक्षण पथकाच्या तपासणीच्यावेळी निदर्शनास आली आहे. या सर्व बाबी तसेच उक्त संदर्भीय शासन परिपत्रक विचारात घेवून क्षेत्रिय कार्यालयाकरीता सर्व समावेशक सुचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

परिपत्रक :

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २२१ प्रमाणे जमीन महसुलाची थकबाकी म्हणून आकारणी योग्य असलेल्या रकमांच्या वसुलीबाबत महाराष्ट्र जमीन महसुल (जमीन महसुलाच्या वसुलीबाबत) नियम १९६७ चे नियम १७ नुसार कार्यवाही करण्यात येते. जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसुल योग्य रकमांची वसुली होण्यासाठी तालुका व जिल्हा स्तरावर करावयाची कार्यपध्दतीबाबत आता पुढीलप्रमाणे सर्व समावेशक सुचना देण्यात येत आहेत.

जिल्हाधिकारी/उपविभागीय अधिकारी यांचे स्तरावर करावयाची कार्यवाही :

१. जिल्हाधिकारी यांचे कार्यालयात प्राप्त झालेल्या महसूल वसुली प्रमाणपत्र प्रकरणांची नोंदवहीत तसेच संगणकावर तातडीने नोंद घेणे.

२. महसूल वसुली प्रमाणपत्राशिवाय इतर प्रकरणी आर.आर.सी. नोंदवहीत नोंदली जाणार नाहीत याची दक्षता घेणे.

३. महाराष्ट्र जमीन महसूल (जमीन महसूलाच्या वसुलीबाबत) नियम १९६७ चे नियम १७ (२) मधील मुद्यांवर माहिती पुरविलेली नसल्यास अथवा अपूर्ण असल्यास सदरचा प्रस्ताव संबंधित विभागास तात्काळ परत करणे.

४. प्रकरण वसुली योग्य असल्याची निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांची धारणा झाल्यास ७ दिवसांत सदर प्रकरण पुढील कार्यवाहीसाठी संबंधित उपविभागीय अधिकारी/तहसिलदार कार्यालयाकडे पाठविणे.

५. उपविभागीय/तहसिलदार कार्यालयाकडे निर्देशित केलेल्या नोंदणीकृत प्रकरणांचा क्षेत्रिय कार्यालयातील प्रकरणांशी दरमहा मेळ घालणे.

६. वसूलचा मासिक अहवाल विहीत नमुन्यात दरमहा ५ तारखेच्या आत न चुकता शासनाकडे पाठविला जाईल याची दक्षता घ्यावी.

७. जिल्हाधिकारी/उपविभागीय अधिकारी यांनी महसूल वसूली प्रमाणपत्र प्रकरणांचा दरमहा आढावा घेवून वसूलीसाठी संबंधीत तहसिलदार यांचेकडे पाठपुरावा करावा.

८. उपविभागीय अधिकारी यांनी देखील वरीलप्रमाणे त्यांच्या कार्यालयात कार्यवाही करावी. शासनाने दिलेल्या आदेशाप्रमाणे उचित कार्यवाही झाली असल्याची खात्री करावी.

९. प्रकरण नोंदवहीची दरमहा तपासणी करावी. पूर्ण कार्यवाही झाली असल्यास पूर्तता अहवाल संबंधित विभागस पाठवावा. त्यानंतर लाल शाईने नोंदवहीमधील संबंधीत अनुक्रमांकाला प्रकरण निकाली काढल्याची खुण (वर्तुळ) करावे.

१०. दरवर्षी ३१ मार्च अखेर नोंदवही अद्यावत करुन शिल्लक थकबाकी निश्चित करावी व थकबाकीचा तालुकानिहाय तपशिल शासनास न चुकता सादर करावा.

तहसिलदार यांचे स्तरावर करावयाची कार्यवाही :

१. तहसिल पातळीवर विहीत नमुन्यात आर.आर.सी.नोंदवही ठेवून प्रकरणांचा नियमित मेळ घातला जाईल याची दक्षता घ्यावी.

२. जिल्हाधिकारी/उपविभागीय कार्यालयाकडून तहसिलदार कार्यालयात प्राप्त झालेल्या महसूल वसूली प्रमाणपत्र प्रकरणांची नोंदवहीत तसेच संगणकावर तातडीने नोंद घ्यावी.

३. सदर नोंदवहीत महसूल वसूली प्रमापपत्राशिवाय इतर प्रकरणे नोंदवली जाणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

४. महाराष्ट्र जमीन महसूल (जमीन महसूलाच्या वसुलीबाबत) नियम १९६७ चे नियम १७(२) मधील मुद्यांवर माहिती पुरविलेली नसल्यास अथवा अपूर्ण असल्यास सदरचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांचेमार्फत संबंधीत विभागास तात्काळ परत करावा.

५. महसूल वसूली प्रमाणपत्र प्रकरणांची नोंदवहीत नोंद झाल्यानंतर तसेच खातेदाराचा पत्ता व त्या अनुषंगिक माहिती उपलब्ध झाल्यावर तहसिलदारांनी खातेदारास वसुलीची पहिली नोटीस द्यावी. नोटीसीत १० दिवसांची मुदत द्यावी व त्यानंतर विहिती कालावधीत पुढील नोटीसा देवून वसुलीची कार्यवाही करावी.

६. ज्या प्रकरणांत पत्ते आणि मालमत्तेचे तपशील अपूर्ण किंवा चुकीचे असतील त्यावेळी इतर विभागाकडे उपलब्ध असलेली माहिती सहभागी करुन वसुलीची कार्यवाही सुरु करावी.

७. पत्त्यावर व्यक्ती आढळत नाही किंवा खातेदाराकडे मालमत्ता नाही अशी वसुली अधिकाऱ्यांची धारणा झाल्यास गावातील प्रतिष्ठीत व्यक्ती किंवा स्थानिक यंत्रणेकडून ----- पोलिस, ग्रामपंचायत/नगरपालिका यांचेमार्फत व्यक्ती/मालमत्तेचा शोध घ्यावा व वसुलीची कार्यवाही नियमानुसार करावी.

८. ज्या प्रकरणात पत्ते आणि मालमत्तेचे तपशील अपूर्ण किंवा चुकीचे असतील व त्याचा शोध घेणे शक्य नसल्याची तहसिलदार यांची धारणा झाल्यास मोघम कारण न देता पंचनामा करुन तसा अहवाल तयार करावा. पंचनाम्यात प्रतिष्ठीत व्यक्ती सरपंच/नगरसेवक/ग्रामसेवक/डॉक्टर/विशेष कार्यअधिकारी/पंचायत समिती सदस्य/जिल्हापरिषद सदस्य इत्यादी लोकांचा सहभाग घ्यावा आणि जिल्हाधिकारी यांचेमार्फत हे प्रकरण संबंधीत विभागास परत करावे व तशी नोंदवहीत नोंद घ्यावी.

९. दिलेल्या मुदतीत रक्कम भरली नसल्यास नियमानुसार थकबाकीदारांच्या नांवे मिळकत जप्तीचा वारंट जारी करावा. त्यात मिळकतीचा तपशील अथवा यादी नमूद करावी. जप्ती वारंट काढण्यास विलंब झाला तर थकबाकीदारास त्याची मिळकत परस्पर विल्हेवाट लावण्याची संधी मिळू शकते. म्हणून थकबाकी वसुलीसाठी थकबाकीदारांची मिळकत संपूर्ण माहितीसह जप्तीची कार्यवाही करावी.

१०. जप्त केलेल्या मालमत्तेची विल्हेवाट लावण्यासाठी जाहीर लिलावाची कार्यवाही करावी. त्यासाठी जप्त मालमत्तेचे विवरण शासन राजपत्रात तसेच स्थानिक दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्द करावे. जाहीर लिलाव करणेची जबाबदारी स्वत: तहसिलदार किंवा त्यापेक्षा वरिष्ठ अधिकाऱ्यांनी करावी.

११. जाहीर लिलावाद्वारे प्राप्त झालेल्या थकबाकीची रक्कम वसुलीचा खर्च वजा करुन जिल्हाधिकारी यांचेमाफ्रत संबंधीत विभागास परत करावी. तशी नोंद नोंदवहीत घ्यावी.

१२. तहसिलदाराने नोंदवहीची नियमकालिक दरमहा तपासणी करावी. पूर्ण कार्यवाही झालेल्या प्रकरणांचा पूर्तता अहवाल जिल्हाधिकारी यांचेमार्फत संबंधीत विभागास पाठवावा. त्यानंतर लाल शाईने नोंदवहीमधील संबंधीत नोंदवहीतील अनुक्रमांकाला प्रकरण निकाली काढल्याची खूण (वर्तुळ) करावे.

१३. महसूल वसूली प्रमाणपत्र पाठविल्यानंतर जर संबंधीत खातेदार/विभागाकडूनच आर.आर.सी वसूल झाल्यास अथवा थकबाकीदाराने संबंधीत विभागाकडे परतफेड केली असल्यास तहसिलदारांनी अशी माहिती उपलब्ध करुन घेवून नोंदवहीत तशी नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालयासही कळवावे.

१४. ज्या प्रकरणात अंशत: वसुली झालेली आहे आणि पूर्ण वसुली शक्य नाही किंवा रक्कम वसुल होणे अजिबात् शक्य नसल्यास पुराव्यांसह ही बाब जिल्हाधिकारी यांचे निदर्शनास आणावी व त्यांच्यामार्फत अशी प्रकरणे संबंधित विभागास परत पाठवावीत व तशी नोंदवहीत नोंद घ्यावी.

१५. ज्या प्रकरणात वसुलीची कार्यवाही करताना न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास जिल्हाधिकारी यांच्या सल्ल्याने योग्य ती कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे निकाली काढलेल्या प्रकरणांचा व वसुल केलेल्या रकमांचा तपशिल जिल्हाधिकारी कार्यालयास वेळोवेळी सादर करावा.

१६. प्रलंबित प्रकरणांचा दरमहा बैठकीच्या वेळी आढावा घ्यावा. वसुलीची कार्यवाही विहित कालावधीत व नियमानुसार सुरु असल्याची खात्री करावी. त्याचप्रमाणे वसुलीच्या कामात

निष्काळजीपणा करणाऱ्या अधिकारी/ कर्मचारी यांचेविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई येईल याची संबंधितांना जाणीव करुन द्यावी व आवश्यकते वेळी तसार प्रस्ताव जिल्हाधिकारी यांचेमार्फत शासनास सादर करावा.

संनियंत्रण :

उपरोक्त कार्यवाहीची (कागदपत्र, नोंदवह्या इ.संबंधी) अचानक तपासणी अथवा निरिक्षण करण्याचे अधिकार विभागीय आयुक्त तसेच मंत्रालयीन दक्षता व निरिक्षण पथकास राहतील. महसूल वसुली प्रमाणपत्राच्या विहित कार्यवाही संबंधीची सर्व जबाबदारी निवासी उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसिलदार व निवासी नायब तहसिलदार यांचेवर सोपविण्यात येत आहे. त्यांनी व्यक्तिश: महसूल वसुली प्रमाणपत्र प्रकरणे हाताळणे, वसुलीची कार्यवाही करणे व विहित मुदतीत अहवाल पाठविणे इ. कार्यवाही करावी. वसुलीच्या कामात निष्काळजीपणा करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-
(रविंद्र नलावडे)
उप सचिव,
महसूल व वन विभाग

प्रति,

१. सर्व विभागीय आयुक्त
२. सर्व जिल्हाधिकारी

प्रत :

१. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव
२. मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव
३. सर्व मंत्रालयीन विभाग
४. महालेखापाल १ / २ (लेखापरिक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
५. महालेखापाल १ / २ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
६. सर्व उप विभागीय अधिकारी.
७. सर्व तहसिलदार
८. निवडनस्ती (टी-२)

महाराष्ट्र जमीन महसूल (महसूलाच्या वसुलीबाबत नियम) १९६७ चे नियम १७नुसार जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल योग्य असलेल्या रकमा (R.R.C.अंतर्गत) वसूल करण्याच्या कार्यवाहीबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन परिपत्रक क्र.लेप-२०१२/प्र.क्र.६४/पुनर्बांधणी/४९/टी-२
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २५.१०.२०१२

वाचा : १) शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र.आईव्ही १०७३/५४२२८/सी-१, दिनांक २२.०८.१९७४.
२) शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र.आईव्ही १०७९/१८१७२७/ल-२, दिनांक ०४.१२.१९७९.
३) शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र.आईव्ही १०७९/१८१७२७/ल-२, दिनांक २६.०५.१९८१.
४) शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र.लेप-२०११/प्र.क्र.५९(भाग-२)/टी-२, दिनांक २७.०३.२०१२.

संदर्भ :

जिल्हाधिकारी / उपविभागीय अधिकारी / तहसिलदार यांचे स्तरावरील महसूल वसुली प्रमाणपत्रांतर्गत (R.R.C.) जमीन महसुलाची थकबाकी म्हणून समजल्या जाणाऱ्या रकमांची वसुली करावयाच्या कार्यपध्दतीबाबत शासन स्तरावरुन शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र.लेप-२०११/प्र.क्र.५९(भाग-२)/टी-२, दिनांक २७.०३.२०१२ अन्वये सर्व संबंधितांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

परिपत्रक :

जिल्हाधिकारी / उपविभागीय अधिकारी / तहसिलदार यांचे स्तरावरील आर.आर.सी.प्रकरणे त्वरेने निकाली काढण्यासाठी अधिक परिणामकारक कार्यपध्दती अवलंबिण्याबाबत सर्व संबंधितांना पुढीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

१. महसूल वसुली प्रमाणपत्रांतर्गत करण्यात येणारी वसुलीची कार्यवाही विहित मर्यादेत पूर्ण करुन प्रकरणे निकाली काढण्यात यावीत, जेणेकरुन आर.आर.सी.प्रकरणे प्रलंबित राहणार नाहीत.

२. आर.आर.सी. प्रकरणातील वसुलीची कार्यवाही अधिक परिणामकारक करण्यासाठी आर.आर.सी. निर्गमित करणाऱ्या विभागाकडून (एम.आय.डी.सी. व तत्सम विभाग) जमिनीचे हस्तांतरण करण्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र देताना संबंधित तहसिलदारांच्या पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

३. आर.आर.सी. निर्गमित करणारे विभाग व आर.आर.सी. वसुलीची कार्यवाही करणारे जिल्हाधिकारी / तहसिलदार यांच्यामध्ये सदर आर.आर.सी. प्रकरणांबाबत आवश्यक त्या सर्व माहितीची देवाण-घेवाण करण्यात यावी, जेणेकरुन आर.आर.सी. प्रकरणांमध्ये वसुलीची कार्यवाही करताना सुलभता निर्माण होईल.

४. जिल्हाधिकाऱ्यांना आर.आर.सी. प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर सदर प्रकरणातील महसूलाची थकबाकी कायद्यातील तरतुदीनुसार महसूल वसुली प्रमाणपत्रांतर्गत वसुल करता येईल किंवा कसे याबाबत खातरजमा करुनच प्राप्त प्रकरणाची नोंदवहीत नोंद घेण्यात यावी. अन्यथा सदर प्रकरणे संबंधित विभागाला परत करण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-
(सु.भि.पाटणकर)
उप सचिव,
महसूल व वन विभाग

प्रति,

१. सर्व विभागीय आयुक्त
२. सर्व जिल्हाधिकारी

प्रत :

१. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव

२. मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव

३. सर्व मंत्रालयीन विभाग

४. महालेखापाल १ / २ (लेखापरिक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.

५. महालेखापाल १ / २ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.

६. सर्व उप विभागीय अधिकारी.

७. सर्व तहसिलदार

८. निवडनस्ती (टी-२)

महाराष्ट्र शासन

क्र.लेप-१०१२/प्र.क्र.पुनर्बांधणी-६६/टी-२
महसुल व वन विभाग, ३२ वा मजला,
सेंटर-१ इमारत, जागतिक व्यापार केंद्र ,
कफ परेड, मुंबई ४०० ००५
दिनांक: ०४.०४.२०१३

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी

विषय : महसुल वसुली प्रमाणपत्रांतर्गत (आर.आर.सी.) करण्यात येणाऱ्या कार्यवाहीबाबत.

क्षेत्रिय कार्यालयांना वसुलीसाठी प्राप्त झालेल्या महसूल वसुली प्रमाणपत्र (आर.आर.सी.) प्रकरणांच्या वसुलीबाबत गांभिर्याने तसेच तत्परतेने कार्यवाही करण्यात येत नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. तसेच बरीच आर.आर.सी. प्रकरणे क्षेत्रिय कार्यालयांमध्ये दिर्घ कालावधीपासून प्रलंबित असून शासनाच्या महसुलाची हानी झाल्याबाबत महालेखाकार (लेखा परिक्षा) -II, नागपूर कार्यालयाने आक्षेप घेतलेला आहे. बऱ्याच प्रकरणांमध्ये असून दिसून आले की, महसूल वसुली प्रमाणपत्रामध्ये कसूरदारांचा पत्ता अपूर्ण स्वरुपात किंवा चुकीचा दिलेला असतो त्यामुळे अशा प्रकरणांत वसुली करणे शक्य होत नाही. परिणामी शासनाच्या महसुलाची हानी होवू शकते. आर.आर.सी.मध्ये नमूद सदर त्रुटींमुळे वसुलच्या कार्यवाहीमध्ये अडचण येवू नये तसेच शासनाच्या महसूलाची हानी होवू नये यासाठी खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. महसूल वसुली प्रमाणपत्र (आर.आर.सी.) जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर त्याची प्राथमिक स्तरावर छाननी करण्यात यावी. छाननी करताना सदर प्रमाणपत्रामध्ये अ) कसूरदाराचे नाव व पत्ता ब)कसूरदाराच्या मालमत्तेचा तपशील क) वसुल करावयाची थकबाकीची रक्कम ड) सदर रक्कम कसूरदाराकडून वसुल करण्यासाठी संबंधित विभागाने पुरेसे प्रयत्न केले असल्याबाबतचा तपशिल इ. बाबी आढळून आल्या तर ते प्रमाणपत्र पुढील कार्यवाहीसाठी स्विकारण्यात यावे व ते स्विकारल्याची पोच मागणीपत्र निर्गमित करणाऱ्या विभागास देण्यात यावी. वरीलपैकी एखादी बाब जरी प्रमाणपत्रात नसेल तर ते प्रमाणपत्र योग्य कारणासह संबंधित विभागास परत करण्यात यावे.

२. वसुलीची कार्यवाही करताना असे आढळून आले की, कसूरदाराचा पत्ता अपूर्ण आहे किंवा चुकीचा आहे ज्यामुळे वसुलीची पढील कार्यवाही करताना अडचणी येत असतील तर याबाबत संबंधित विभागास कळवून कसूरदाराच्या पूर्ण पत्त्याचा तपशील देण्याची मागणी करावी.

३. त्याचप्रमाणे ग्रामीण क्षेत्रात ग्रामपंचायतीकडून व शहरी क्षेत्रात नगर पंचायत / नगरपालिका / महानगरपालिका / नगर भूमापन कार्यालयाकडून कसूरदाराच्या मालमत्तेचा तपशिल मागविण्यात यावा. सदर कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे वसुलीबाबत पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

४. कसूरदार ज्या तालुक्याच्या अखत्यारित राहत असेल त्या तालुक्यातील बँकांमध्ये सदर कसूरदाराचे खाते आहे किंवा कसे? याबाबत संबंधित बँकांकडून माहिती घेवून त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

५. या व्यतिरिक्त नव्याने उपलब्ध झालेल्या पत्त्यानुसार सदर कसूरदार त्या पत्त्यावर आढळून आला नसेल तर तसा पंचनामा करुन सदर आर.आर.सी.प्रकरण संबंधित विभागास परत करण्यात यावे.

६. आर.आर.सी.प्रकरणांच्या वसुलीच्या बाबतीत तत्परतेने कार्यवाही करण्यासाठी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन परिपत्रकांचे अवलोकन करण्यात यावे.

सही/-
(सु.भि.पाटणकर)
उप सचिव,
महसूल व वन विभाग

प्रति,

१. सर्व विभागीय आयुक्त
२. निवडनस्ती टी-२

------ooo------

प्रकरण - ३

जमीन महसुली वसूली प्रमाणपत्र (RRC)

➢ **वसूली कार्यवाहीचे टप्पे :**

(१) **एफ. आर. पी. बाबत साखर आयुक्तालयाकडून केंद्र शासनास पाठविला जाणारा विहीत नमुन्यातील दर पंधरवडा अहवाल:**

- साखर हंगाम वर्ष सुरु झाल्यानंतर (१ ऑक्टोबर ते ३० सप्टेंबर) राज्यातील कारखान्यांनी गाळप केलेला ऊस त्यापोटी ऊस (नियंत्रण) आदेश १९६६ कलम ३ नूसार ऊस पुरवठादार शेतकरी यांना पुरविलेल्या ऊसापोटी द्यावयाची रक्कम व कलम ३ (ए) नुसार उशिरा दिलेल्या रक्कमांचा आढावा घेण्यासाठी प्रत्येक पंधरवड्यात विहीत नमुन्यात अहवाल तयार करण्यात येतो.
- कारखान्याकडून प्राप्त झालेली माहिती संबंधीत प्रादेशिक सहसंचालक (साखर) तपासून हा अहवाल साखर आयुक्तालयास सादर करतात.
- सदर अहवाल दर पंधरा दिवसांनी विहीत नमुन्यात केंद्र शासनाला पाठविला जातो. या अहवालाद्वारे विहीत काल मर्यादेत ऊस पुरवठादारांना एफ. आर. पी. ची रक्कम न देणाऱ्या कारखान्यांवर संनियंत्रण ठेवता येते.
- हंगाम संपेपर्यंत व त्यानंतरही हा अहवाल तयार केला जातो. तो साखर आयुक्तालयाच्या **https://sugar.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर माहितीसाठी जाहीर करण्यात येतो.

↓

(२) **एफ. आर. पी. अहवालावर प्रादेशिक कार्यालयाकडून संनियंत्रण:**

(अ) कारखान्यांकडून एफ. आर. पी. अदायगीची माहिती संकलित करताना कार्यक्षेत्रातील कोणते कारखाने विलंबाने सदर रक्कमांची अदायगी करतात, कोणत्या कारखान्यांच्या बाबत ऊस पुरवठादार शेतकऱ्यांच्या तक्रारी आहेत, याचा आढावा संबंधीत प्रादेशिक सहसंचालक साखर घेतात.

(आ) या कारखान्यांनी सदर रक्कमा तात्काळ देण्यासाठी त्यांच्याकडे पाठपुरावा केला जातो. पाठपुरावा करुनही अशा रक्कमां न दिल्यास त्यानंतर आवश्यकतेनुसार ऊस (नियंत्रण) आदेश १९६६ मधील तरतुदींनुसार कारवाई करण्यासाठी प्रस्ताव मुख्यालयास का पाठवू नये? यासाठी संबंधीत कारखान्याच्या सक्षम अधिकाऱ्यास प्रादेशिक सहसंचालक (साखर) कार्यालयाकडून लेखी नोटीस पाठवून सुनावणी घेतली जाते.

(इ) कारखान्यांनी ऊस (नियंत्रण) आदेश १९६६ च्या कलम ३ मधील तरतुदीनुसार किती शेतकऱ्यां बरोबर पेमेंट अदायगीबाबत वैयक्तीक करार केले आहेत ? याचीही तपासणी केली जाते.

कराराची तरतुद

१) साखर कारखान्यांना ऊस (नियंत्रण) आदेश १९६६ मधील तरतूदीनुसार ऊस पुरवठा केल्यापासून १४ दिवसात ऊस दराची रक्कम मिळण्याचा हक्क आहे. तथापि ऊस पुरवठादाराने कारखान्याबरोबर देय रकमेबाबत वैयक्तिक करार केल्यास करारात नमूद केलेप्रमाणे तो ऊसदराची रक्कम स्विकारण्यास पात्र ठरतो. करार करणे शेतक-यांवर बंधनकारक नाही

२) जाहिर केलेल्या एफ.आरपी दरापेक्षा कमी रकमेचा करार करता येत नाही.

३) तथापी १४ दिवसांपेक्षा उशिरा एफ. आर. पी. रक्कम मिळाल्यास ऊस पुरवठादार नियमानुसार व्याज मिळण्यास पात्र ठरतात.

९. वरील प्रमाणे तपासणी केल्यावर वसूलीसाठी कारवाई करण्याची आवश्यकता आहे या निर्णयाप्रत आल्यास साखर आयुक्तालयास महसूली वसूली प्रमाणपत्र (आर. आर. सी.) करण्यासाठी प्रस्ताव शिफारशीसह प्रादेशिक कार्यालयाकडून पाठविला जातो. प्रस्तावासोबत कारखान्यांची खालील माहिती पाठविणे अपेक्षीत आहे.

१. ऊस पुरवठा करणाऱ्या व थकीत एफ. आर. पी. असलेल्या शेतकऱ्यांची कारखान्याकडून प्राप्त करुन घेतलेली प्रमाणित यादी.

२. एकूण गाळप, देय एफ. आर. पी. रक्कम, प्रत्यक्ष दिलेली रक्कम, थकबाकी व व्याज इत्यादी माहिती.

३. कारखान्याच्या जंगम व स्थावर मालमत्तेचे विहीत नमुन्यातील विवरणपत्र.

↓

३. **<u>आर. आर. सी. प्रमाणपत्र निर्गमीत करणे</u>**

साखर आयुक्त कार्यालय प्रादेशिक कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या उपरोक्त प्रस्तावावर पुढील कार्यवाही करते. संबंधीत कारखान्यांचा एफ. आर. पी. बाबत पुढील पंधरवडी अहवाल पाहीला जातो. पुन्हा एकदा सुनावणीची संधी देण्याची आवश्यकता वाटत असेल तर ती दिली जाते. तरीही ऊस पुरवठादार शेतकऱ्यांना एफ. आर. पी. रक्कम देण्यातील उदासीनता दिसत असेल व असे प्रमाणपत्र वसूलीसाठी निर्गमीत करणे आवश्यक आहे याची खात्री झाल्यास आर. आर. सी. प्रमाणपत्र साखर आयुक्त निर्गमीत करतात. याची तरतुद ऊस नियंत्रण आदेश १९६६ खंड ३(८) मध्ये आहे.

- **कलम ३(८)** ऊस बिलाचे पेमेंट व विलंबावधीसाठी व्याज संबधीत ऊस पुरवठादारांना अदा करण्याकरीता संबधीत जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांना ऊस बिलाची प्रलंबित रक्कम आणि त्यावरील होणारे विलंबावधीचे व्याजाची संबधीत कारखान्याकडून जमिन महसुलाची थकबाकी समजून महसुली वसुली प्रमाणपत्र बाबत आदेश निर्गमित करतील.

- कलम ३(८) नुसार निर्गमित करण्यात आलेल्या आर. आर. सी. च्या आदेशांची महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ कायद्यानुसार अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येते.

↓

४. **<u>संबंधीत जिल्हाधिकारी यांचे नांवे RRC प्रमाणपत्र निर्गमीत झाल्यावर प्रादेशिक सहसंचालक (साखर) यांनी करावयाची कार्यवाही</u>**

ऊस पुरवठा करणाऱ्या व थकीत एफ. आर. पी. असलेल्या शेतकऱ्यांच्या याद्या कारखान्याच्या कार्यकारी संचालक यांच्या सही व शिक्यासह प्रतिस्वाक्षरी करुन जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयास पुढील कार्यवाही करण्यासाठी शक्य तितक्या लवकर उपलब्ध करुन दिल्या पाहीजेत.

जिल्हाधिकारी यांना प्रादेशिक सहसंचालक कार्यालयाकडून आर. आर. सी. कारवाई करण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रमाणपत्राचा नमुना		
अ.क्र.	**तपशिल**	**माहिती**
१	आर.आर.सी. निर्गमीत करणाऱ्या, बँक / पतसंस्था / वित्त संस्था / विभाग इ. च्या अधिकाऱ्याचे संपूर्ण नाव, हुद्दा व पत्ता इत्यादीचा तपशिल.	साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२	ज्या तरतुदीअंतर्गत आर.आर.सी. जमीन महसूल थकबाकीची रक्कम म्हणून वसूल करण्यासाठी पाठविलेला आदेश.	ऊस (नियंत्रण) आदेश, १९६६ चे कलम ३(३) नूसार.
३	क्रमांक व ऑर्डरची तारीख ज्या अंतर्गत रक्कम वसूल करण्याचे आदेश आहेत	--
४	पैकी वसुलीची रक्कम	......लाख.
५	कारखान्याचे संपूर्ण नाव व पत्ता, इमारतीचे नाव, खोली क्रमांक, गाव, तालुका, जिल्हा व पिनकोड क्र	श्री. ..... सहकारी/खाजगी साखर कारखाना लि.
६	ज्या विरूद्ध प्रक्रिया चालविली जाऊ शकते अशा मालमत्तेचा तपशिल	---
	अ) जंगम मालमत्ता- भांडार व अतिरिक्त वस्तू	---
	ब) कायम/स्थावर मालमत्ता - (Immovable property)	---
	क) चालू मालमत्ता १. साखर साठा २. मळी साठा ३. बगॅस साठा ४. प्रेसमड साठा ५. इथेनॉल / स्पिरीट इ. साठा	 ......लाख ......लाख ......लाख ......लाख ......लाख
	एकूण (अ+ब+क)	......लाख
------विशेष लेखापरिक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (साखर)-----		प्रादेशिक सहसंचालक (साखर)

- महाराष्ट्र जमिन महसूलीच्या वसूलीबाबत नियम १९६७ नियम १७(२) नुसार आवश्यक असलेली वरील माहिती जिल्हाधिकारी यांना त्वरीत देणे आवश्यक असते.

↓

५. **<u>जिल्हाधिकारी स्तरावर करावयाची कार्यवाही</u>**

- महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २२१ प्रमाणे जमीन महसूलाची थकबाकी म्हणून आकारणी योग्य असलेल्या रक्कमांच्या वसूलीबाबत महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम (जमीन महसूलाच्या वसूलीबाबत) नियम १९६७ चे नियम १७ नुसार कारवाई करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयातील आर.आर. सी. नोंदवहीत नोंद घेतली जाते.
- आर. आर. सी. नोंदवहीमध्ये नोंद घेवून महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम (जमीन महसूलाच्या वसूलीबाबत) नियम १९६७ चे नियम १७ (२) मध्ये नमुद केलेली माहिती मिळण्यासाठी आदेशात समन्वयासाठी नियुक्त केलेल्या संबंधीत प्रादेशिक सहसंचालक (साखर) कार्यालयाकडून घेतली जाते.

➢ **महाराष्ट्र जमीन महसूलाच्या वसूलीबाबत नियम १९६७ चे नियम १७ (२):**
अशा मागणीत पुढील तपशिल अंतर्भुत असेल —

अ) कसूरदाराचे पुर्ण नांव व पत्ता.

ब) वसूल करावयाची रक्कम.

क) जमीन महसूलाची थकबाकी म्हणून विधीच्या ज्या उपबंधान्वये रक्कम वसूली योग्य असेल तो उपबंध.

ड) रक्कम वसूल करता येईल ती पध्दती प्रक्रिया.

इ) जिच्याबाबतीत त्या प्रकियेचा अवलंब करता येईल ती मालमत्ता. विहीत कालावधीत ही माहिती संबंधीतांना प्राप्त न झाल्यास निवासी जिल्हाधिकारी यांनी आर. आर. सी. आदेश निर्गमीत करणाऱ्या प्राधिकरणास तात्काळ ज्ञात करावे व परिपुर्ण प्रमाणपत्र प्राप्त होताच प्रांत / तहसिलदार यांची नियुक्ती आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी करावी.

↓

६. <u>संबंधीत तहसिलदार म्हणजेच प्राधिकृत अधिकाऱ्याने करावयाची कार्यवाही</u>

- संबंधीत तहसिल कार्यालयात विहीत नमुन्यातील RRC नोंदवहीत प्रकरण नोंदवले जाते.
- महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम (जमीन महसूलाच्या वसूलीबाबत) नियम १९६७ चे नियम १७ (२) नुसार प्राप्त माहिती पुर्ण आहे याची खातरजमा केली जाते. नसल्यास ती पुर्ण करुन घेतली जाते.
- महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम (जमीन महसूलाच्या वसूलीबाबत) नियम १९६७ च्या **नियम ५ नुसार नमुना १** मध्ये १० दिवसांच्या मुदतीची कसूरदारास मागणीची नोटीस दिली जाते. हा नमुना कलम १७८ नुसार असतो.

↓

७. <u>वसूलीची कारवाई करताना घेतली जाणारी दक्षता/म.ज.म.अ. वसूलीबाबत नियम १९६७ चे नियम ५ नुसार नोटीस निर्गमीत करणे</u>

- ज्या प्रकरणांत पत्ते व मालमत्तेचे तपशिल अपुर्ण किंवा चूकीचे असतील त्यावेळी संबंधीत विभाग उपलब्ध असलेली माहिती जमेस धरुन वसूलीची कारवाई करतात.
- पत्त्यावर व्यक्ती आढळत नसल्यास किंवा मालमत्ता दिसून येत नसल्यास, अशी वसूली करण्यासाठी गांवातील प्रतिष्ठीत व्यक्ती/ स्थानिक यंत्रणांची जसे पोलिस, ग्रामपंचायत, नगर पालिका यांची मदत घेतली जाते.
- व्यक्ती व मालमत्तेचा शोध घेतला जातो.
- त्यानंतर नियमानुसार वसूलीची कार्यवाही केली जाते.

↓

८. <u>विक्री / सरकार जमा करण्याची कार्यवाही व घ्यावयाची दक्षता नमुना -२ नोटीस निर्गमीत करणे.</u>

- प्रथम नोटीस देवूनही थकबाकीची वसूली न झाल्यास महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ कलम १७९ नुसार जप्तीची कारवाई करुन सदर जमिनींची महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ **कलम ७२, ७३** नुसार विक्री / विल्हेवाट लावता येते. **तत्पुर्वी**
- अशी अशी विक्री करण्यापुर्वी/ सरकार जमा करण्यापुर्वी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ **कलम १९२ व १९३** नुसार उद्घोषणा नोटीसीद्वारे केली जाते.
- नोटीसीच्या दिनांका पासून १५ दिवसांची मुदत संपण्याची वाट पाहीली जाते. जेणे करुन कसूरदारास नैसर्गिक न्याय तत्वानुसार थकीत रक्कमां भरण्याची वाजवी संधी मिळू शकेल.

↓

९. <u>कसूरदाराची जंगम मालमत्ता अटकावून ठेवणे</u>

- **म.ज.म.अ. वसूलीबाबतच नियम १९६७ चे नियम ९ नुसार अधिपत्र नमुना ३ निर्गमीत करणे.**
- महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ **कलम १८०** नुसार कसूरदार व्यक्तीची जंगम मालमत्ता अटकावून तिची विक्री करण्याची व्यवस्था करता येते. त्यासाठी :
  - ➢ म.ज.म.अ. वसूलीबाबतच नियम १९६७ चे **नियम ९, नमुना क्र. ३** नुसार अधिपत्र जारी करतात.
  - ➢ **कलम १८० (२)** नुसार सदर जंगम मालमत्ता अभिरक्षेत ठेवण्याबाबतचा निर्णय घेतात.
  - ➢ महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ **कलम १८० (३)** नुसार मालमत्तेची यादी प्रमाणित करतात.

लक्षात ठेवा ! साखर कारखान्यांकडे सर्वसाधारणपणे खालील जंगम व स्थावर मालमत्ता असते.	
अ) **जंगम मालमत्ता**	ब) **स्थावर मालमत्ता**
• साखर • वाहने • फर्निचर • संगणक • पेट्रोल / डिझेल • अल्कोहोल/इथेनॉल • बगॅस • मळी • खते • प्रेसमड • स्टोअर्स स्पेअर्स • बँक बॅलन्स • गुंतवणूका	• कारखाना मशिनरी • शेत जमीन • बांधकाम • इमारती • रेस्ट हाऊस • साखर गोडावून • पेट्रोल पंप, • डिस्टीलरी

↓

१०. स्थावर मालमत्ता जप्त करण्याचा आदेश, म.ज.म.अ. वसूलीबाबतच नियम १९६७ चे नियम ११, नोटीस नमुना क्र. ४ निर्गमीत करणे.

- आवश्यकतेनुसार महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ **कलम १८२** नुसार सदर मालमत्ता प्रयोजनासाठी नियुक्त करता येईल अशा कोणत्याही अभिकर्त्याच्या व्यवस्थेखाली आणता येते. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांचे अधिकार महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ **कलम १८५** मध्ये नमुद आहेत.
- महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ **कलम १८१ ते १८५** नुसार कसूरदाराची स्थावर मालमत्तेची जप्ती करुन विक्री करताना कसूरदारास मालमत्तेची विल्हेवाट

लावण्यावर प्रतिबंध करण्यासाठी पुरक आदेश **म.ज.म.अ. वसूलीबाबतच नियम १९६७ चे नियम ११ नमुना ४ मध्ये आहे तो निर्गमीत केला जातो. यास पुरेशी प्रसिध्दी देण्यात येते.**

↓

१२. जप्त केलेल्या मालमत्तेच्या विक्रीची उद्घोषणा करणे, म.ज.म.अ. वसूलीबाबतच नियम १९६७ चे नियम १२ (२) (अ)/ (ब)/(क) नुसार नोटीस नमुना क्र. ५/६/७ निर्गमीत करणे.

- महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या **कलम १८१ ते १८५** नुसार जप्त / समपहरण केलेल्या मालमत्तेच्या **विक्रीची उद्घोषणा व लेखी नोटीस म.ज.म.अ. वसूलीबाबतच नियम १९६७ चे नियम १२ (२) नमुना ५ मध्ये दिली जाते.** अशी विक्री सामान्यत: मालमत्ता ज्या गावात/शहरात असेल तेथे केली जाते.
- जप्त् केलेल्या व म.ज.म.अ. वसूलीबाबतच नियम १९६७ च्या **नियम ९ नमुना ३** नुसार **अटकावून ठेवलेल्या जंगम मालमत्तेच्या** विक्रीची उद्घोषणा व लेखी नोटीस म.ज.म.अ. वसूलीबाबतच नियम १९६७ चे **नियम १२ (२) (ब) नमुना ६** मध्ये दिली जाते.
- जप्त केलेल्या व म.ज.म.अ. वसूलीबाबतच नियम १९६७ चे **नियम १२(२) (क)** नुसार **स्थावर मालमत्तेची विक्रीची उद्घोषणा व लेखी नोटीस नमुना क्र. ७** मध्ये दिली जाते.
- म.ज.म.अ. वसूलीबाबतच नियम १९६७ चे **नियम १३** नुसार कोणतीही जमीन/मालमत्ता जाहीर लिलावाने विकण्यात येईल. त्याबाबत **हातची किंमत (Upset Price)** जिल्हाधिकाऱ्यांना योग्य वाटल्यास तशी ठरवली जाते.

↓

११. विक्री पुर्ण झाल्यानंतर करावयाची कार्यवाही :

विक्री नंतर खरेदीदारास म.ज.म.अ. वसूलीबाबतच नियम १९६७ चे **नियम १४** नुसार

स्थावर मालमत्तेची विक्री कायम झाल्यावर **नमुना ८** मध्ये विक्रीचे प्रमाणपत्र दिले जाते.

अटकावून ठेवेलेल्या स्थावर मालमत्तेचे विक्रीचे प्रमाणपत्र म.ज.म.अ. वसूलीबाबतच नियम १९६७ चे **नियम १४ नुसार** व **नमुना -९ मध्ये** दिले जाते.

- महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ कलम १९९ ते २०० नुसार विक्री पुर्ण झाल्यावर जमिनीच्या महसूलाच्या वसूलीबाबत **नियम ६७**, **नियम १५** नुसार जंगम मालमत्तेची विक्री पुर्ण झाल्यावर ती खरेदीदारास देतील तसा आदेश पारित केला जातो.
- वरील कार्यवाही करताना **नियम १६** मध्ये ताबा देण्याची कार्यपध्दती अनुसरली जाते. **नियम १४** मधील तरतुदी ही पाहिल्या जातात.

↓

१३. तत्पुर्वी कसूरदार व्यक्तीस आवश्यकतेनुसार अटक करणे. स्थानबध्द करणे याबद्दल असलेले अधिकार व त्यांचा वापर करणे.

- महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ **कलम १८३ नुसार** कसूर करणाऱ्या व्यक्तीस अटक करणे, स्थानबध्द करणेबाबत तसेच अशा कारवाईचा खर्च वसूल करणे या तरतुदींचा आवश्यकतेनुसार वापर करतात.
- अशी कार्यवाही करताना नैसर्गीक न्याय तत्वांचे पालन होईल हे पहातात.
- लेखी नोटीसची मुदत १० दिवसांची असते.
- ही मुदत संपल्यावरही कसूरदाराने रक्कम दिली नाही तर जिल्हाधिकाऱ्यांना योग्य वाटेल तर **अनुसूची अ मधील** अधिकार पत्राद्वारे जिल्ह्याच्या दिवाणी तुरुंगात कसूरदारास कैदेत ठेवण्यासाठी पाठवितात.

↓

१४. अंशत: वसूल झालेल्या प्रकरणांबाबत .

- ज्या प्रकरणांत अंशत: वसूली झाली आहे आणि पुर्ण वसूली होण्याची अजिबात शक्यता नाही. याची पुर्णत: खातर जमा झाल्यानंतरच व अशी आवश्यक व शक्य तितकी तपासणी केल्यानंतरच पुराव्यासह ही बाब जिल्हाधिकारी यांचे निदर्शनास आणली जाते. व त्यांचे मार्फतच अशी प्रकरणे संबंधीत विभागास परत पाठवली जातात.

↓

१५. <u>साखर कारखान्यांच्या आर. आर. सी. आदेशाची अंमलबजावणी करताना ऊस (नियंत्रण) आदेश १९६६ मधील जिल्हाधिकारी यांचे अधिकार व कर्तव्य :</u>

- वसूलीची पुर्ण कार्यवाही करुन रक्कम जमा होताच ज्या ऊस पुरवठादार शेतकरी इत्यादींची एफ. आर. पी. ची रक्कम प्राप्त् यादी प्रमाणे थकीत आहे. त्या प्राप्त यादीतील नियमांनुसार रक्कम मिळण्यास पात्र असलेल्या ऊस पुरवठादार शेतकरी इ. याबाबत कळविले जाते. जाहीर नोटीस देवून संबंधीतांना त्यांचे Claims (दावे) सादर करण्याच्या सूचना दिल्या जातात.
- ज्या प्रकरणांत ३० दिवसानंतर ही जे दावे प्राप्त होतील त्या प्रकरणांचीही जिल्हाधिकारी यांनी उशीर झालेल्या कारणांची तपासणी करुन, लेखी कारणे नमुद करुन समाधानकारक कारणे नमुद असल्यास असे दावे विचारात घेतात.
- साखर आयुक्त यांच्या ऊस (नियंत्रण) आदेश १९६६ चे खंड ३(८) नुसार निर्गमीत केलेल्या आर. आर. सी. आदेशातील नमुद रक्कमेपेक्षा कमी रक्कम जमा असेल तर जिल्हाधिकारी हे प्राप्त रक्कमेचे वाटप संबंधीत पात्र ऊस पुरवठादार शेतकरी इ. यांना योग्य वाटेल त्या प्रमाणांत वाटप करतात.
- कलम ३ (१२) मध्ये नमुद तरतुदींनुसार उर्वरीत रक्कम वसूलीसाठी आवश्यक ते प्रयत्न सदर वसूलीची रक्कम पुर्ण होई पर्यंत करतात.

- जिल्हाधिकाऱ्यांकडून रक्कम प्राप्त झाल्यावर संबंधीत पात्र ऊस पुरवठादार शेतकरी इ. खात्यामध्ये त्यापुढील १० दिवसांच्या आत रक्कमां जमा होतील याची दक्षता संबंधीत घेतात.
- उद्घोषणा करुन व उपरोक्त कार्यवाही करुन ही रक्कम घेण्यास नोटीस दिलेल्या दिनांका पासून तीन वर्षामध्ये ऊस पुरवठादार शेतकरी न आल्यास या रक्कमां राज्याच्या एकत्रित निधीमध्ये जमा करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी करतात.

----- ००० -----

प्रकरण -४

आर. आर. सी. वसुलीवर परिणाम करणारे न्यायनिर्णय

अ) सर्वोच्च न्यायालयाचे न्यायनिर्णय :

- <u>देना बँक विरूद्ध भिकमभाई प्रभुदास पारेख कं.</u> व इतर (2000 **AIR SCW** 4237) या **दावा:**

  या दाव्यामध्ये घटनेच्या **कलम ३७२**(i) च्या कार्यकक्षेत सर्वसामान्य नियमानुसार 'शासकीय कर्ज वसुलीस प्राधान्य' दिले जाईल असे आहे. मात्र असे प्राधान्य शासकीय वसुलीस फक्त इतर 'असुरक्षित धनको' (unsecured creditors) च्या तुलनेत दिले जाते. मा. सर्वोच्च न्यायालयाने वैधानिक देय रकमा (Statutory Dues) वसुलीस, 'सुरक्षित धनको' (Secured Creditors) च्या तुलनेत जर अशी कर्जे वितरित करताना शासनाने कायदा, शासन निर्णयात प्राधान्याबाबत विशेष तरतूद नमूद केलेली असेल तरच प्राधान्य मिळेल ही बाब स्पष्ट केली आहे. या न्याय निर्णयानंतर ब-याच केंद्रिय करविषयक कायद्यांमध्ये शासनाच्या 'First Charge' बाबत सुधारणा करण्यात आली आहे.

- केंद्र शासन विरूद्ध सिकॉम लि. व इतर या **CA7132/8 (Arise) out of SLP(c) No.** 211370/07) **दावा** :

  या न्यायनिर्णयात राज्य वित्तीय महामंडळ, कायदा १९५१ च्या पार्श्वभूमीवर केंद्रिय अबकारी कराला सुरक्षित कर्जाच्या (Secured Creditors) तुलनेत प्राधान्य मिळेल का? याचा विचार केला आहे. सिकॉमने त्यांच्या १९५१ कायद्याच्या तरतुदीनुसार कर्जदाराकडून गहाणखत करुन घेतले. याच कालावधीत कर्जदाराची अबकारी कराची रक्कम देणे बाकी होती. कर्जदार सातत्याने थकबाकीत गेल्याने, सिकॉमने मालमत्तेचा ताबा कायद्यातील तरतूदीनुसार नोटीस देऊन विधीवत घेतला. सदर थकीत रकमेच्या वसुलीसाठी कसुरदाराची मालमत्ता जप्त करून लिलाव करण्याची प्रक्रिया सुरू केली. सिकॉमचा या मालमत्तेवर 'First Charge' असल्याचे नोटीसीत नमूद केले होते. त्यामुळे केंद्रीय अबकारी खात्यानेही त्यांच्या थकित कराच्या रकमा वसुलीसाठीसुध्दा प्रयत्न केले. त्याचा उपयोग न झाल्याने मा. सर्वोच्च न्यायालयात केंद्रीय अबकारी खात्याने दावा दाखल केला. 'महामंडळाच्या थकीत रक्कमांच्या वसुलीस प्राधान्य द्यावे काय', किंवा 'केंद्रीय कराच्या

वसुलीबाबत प्राधान्य द्यावे’ याबाबत या दाव्यामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने विस्ताराने निरिक्षणे नोंदवली आहेत.

- मा. उच्च न्यायालयाने या दाव्याचा विचार करताना, विविध न्यायनिर्णयांद्वारे केंद्रिय अबकारी कराच्या वसुलीची कार्यवाही केंद्रिय अबकारी कर, **नियम २१३ (२)** व महसूल अधिनियम १९६६ च्या **कलम ३२ (ग)** व **कलम १५१**च्या तरतूदी पाहता जमीन महसूलाच्या वसुलीच्या पध्दतीप्रमाणे करणे आवश्यक राहिल हि बाब स्पष्ट होते. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६, **कलम १६९ (१)** मध्ये जमीनीच्या संबंधात देय झालेल्या जमीन महसुलाची थकबाकीही त्या जमिनीवरील तिच्या प्रत्येक भागावरील ‘सर्वश्रेष्ठ भार’ राहिल. (Shall be paramount charge on the land and every part thereof and shall be precedence over any other debt, demand or claimed whatsoever whether in respect of mortgage, judgment, decree, execution or attachment) या निर्णयाचा उल्लेख केला.

सिकॉमच्या वकिलांनी **कंपनी अधिनियम, १९५६ सेक्शन ५२९A** ची तरतूद **सिकॉम कायदा १९५१, कलम ५६** मध्ये विशेष करून घातली गेल्याची बाब निदर्शनास आणली.

या दाव्यामध्ये वसूलीसाठी सुरक्षीत धनको (Secured Creditor) ना प्रथम प्राधान्य इतर वसूलींच्या तुलनेत दिले आहे आणि एफ. आर. पी. रक्कमांची, शासनाची वसूली ही असुरक्षीत धनको (Unsecured Creditor) अशी गणली जाते. त्यामुळे बॅकांच्या वसूलीला न्यायालयाच्या दृष्टीने प्रथम स्थान मिळेल ही बाब स्पष्ट होते.

- **Bank of Bihar Vs State of Bihar & others (AIR 1971 SC 1210)**

दावा:

या दाव्यात अपिलकर्ता बँकेने कसुरदार साखर कारखान्याची साखर जप्त करून स्वत:च्या ताब्यात थकित कर्जाच्या वसुलीसाठी ठेवली होती. ऊस आयुक्त (Cane Commissioner) यांनी त्यांच्या कायद्यानुसार ऊसबील थकबाकीच्या वसुलीसाठी रक्कम जप्त करून अपिलकर्त्यास न देता शासकीय तिजोरीत ठेवली होती. या प्रकरणात Contract Act **कलम १७२** च्या तरतूदीत सुरक्षीत धनको (Secured Creditors)

ची व्याख्या नमूद केली आहे. त्या तरतुदीनुसार **राज्य शासनास तीच्या वसूलीसाठी Secured Creditors ने i.e. बँकेने जप्त केलेली साखर जप्त करण्याचा कोणताही हक्क नाही हे न्यायालयाने स्पष्ट केले.**

- या न्यायनिर्णयावर विचार करताना मा. सर्वोच्च न्यायालयाने सिकॉम कायदा १९५१ मधील Non-Obstante Clause **Section 46B** ची तरतूदीनुसार होणारी वसुली ही कायदेशीर (Statutory) ठरवली.

> " **46B Section**- Effect of Act on other lows- The provision of this Act and of any rule or orders, made there under shall have effect not withstanding anything inconsistent there with contained in any other law for the time being in force or in the memorandum of articles of association of an industrial concern or in any other instrument having effect by virtue of any law other than this act, but save as aforesaid, the provisions of this act shall be in addition to, & not in derogation of any other law for the time being applicable to the industrial concern."
>
> The non- obstante clause shall not only prevail over the contract but also other laws. (See **Periyar & Pareekanni Rubber Ltd Vs State of Kerala** ((2008(4) **SCALE** 725))

त्यामुळे केंद्रशासनाच्या अपिलात मेरीट नाही म्हणून अपील खारीज करून केंद्रशासनास दंडही बसवला. या न्यायनिर्णयाचा मुद्दाम विस्ताराने उल्लेख या पुस्तकात करण्यात आला आहे. याचा दूरगामी परिणाम सर्वत्र सुरक्षीत धनको (Secured Creditors) विरुध्द असुरक्षीत धनको (Unsecured Creditors) वर होणार आहे. एफ.आर.पी.ची वसुली ही 'असुरक्षीत धनको' (Unsecured Creditors) या प्रकारात मोडते. ही बाब सर्वांनी लक्षात ठेवली पाहिजे. या न्यायनिर्णयाचा खोलवर विस्तृत विचार करून यापुढे तरी शासकीय भागभांडवल, कर्जे, शेतकरी बांधवांच्या देण्याच्या रकमा या सुरक्षीत कशा करता येतील? त्यानुषंगाने संबंधित केंद्र/राज्य शासनाच्या कायद्यात योग्य ती दुरूस्ती करण्याची आवश्यकता आहे.

ब) खाजगी कारखान्यांच्या बाबतचा महत्वाचा न्यायनिर्णय :नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनल:

- **न्यु फलटण शुगर वर्क्स लि. साखरवाडी, ता. फलटण, जि. सातारा. (NCLT मुंबई बेंच)** दावा नं. MA3271/19 In C.P. No. 2956/ I&BP/18

या खाजगी साखर कारखान्याने २०१७-१८ या गाळप हंगामामध्ये गाळप केलेल्या ऊसाच्या देय एफ. आर. पी. पोटी थकीत रक्कमांच्या वसूलीसाठी निर्गमीत आर. आर. सी. आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकारी, सातारा यांना नेमण्यात आले. या प्रमाणपत्राची वसूली करण्याची प्रक्रिया सुरु होताच या कारखान्याला सदर हंगामासाठी वित्त पुरवठा करणाऱ्या कॉसमॉस को-ऑप बँक (Financial Creditors) यांनी न्यु फलटण शुगर वर्क्स लि. साखरवाडी, ता. फलटण, जि. सातारा (Corporate Debtor) यांचे विरुध्द नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनल मुंबई बेंच यांचेकडे दिवाळखोरीचा कायदा, २०१६ (Insolvency and Bankruptcy Code २०१६) च्या तरतुदीनुसार दाद मागितली.

National Company Law Tribunal (NCLT) :

कंपनी अधिनियम १९५६, BIFR बोर्डाकडील थकीत केसेस, Sick Industrial Companies (Special Provision) Act १९८५ कडील केसेस व कंपनी अधिनियम १९५६ नुसार चालविण्याच्या केसेस साठी दि. ०१ जून २०१६ पासून जस्टीस जैन कमिटीच्या शिफारशीनुसार लवादाची स्थापना करण्यात आलेली आहे. कंपनी कायद्यानुसार चालविण्याच्या केसेस जसे लवाद, तडजोड, पुर्नगठन, संस्था गुंडाळणे (Winding Up) अशा केसेस चालविल्या जातात. या ट्रिब्युनलपुढे चालविण्यात येणाऱ्या व तशी शक्ती प्रदान करण्यात आलेल्या केसबाबत कुठल्याही न्यायालयात दावा दाखल करता येत नाही. तशी तरतुद या ट्रिब्युनल स्थापन करण्यात आलेल्या केंद्रीय कायद्यात करण्यात आलेली आहे.

कंपनी अधिनियम १९५६ खाली नोंदविण्यात आलेल्या या खाजगी कारखान्यावर NCLT ट्रिब्युनलच्या दि. २२.०२.२०१९ चे आदेशानुसार दिवाळखोरी जाहीर करण्याबाबतची

प्रक्रिया चालू आहे. कारखान्यावर सदर प्रक्रिया पार पाडण्यासाठी IRP (Interim Resolution Professional) ची नियुक्ती झालेली आहे. नियुक्त CoC (Committee of Creditors) यांनी अनेक बैठका घेवून कारखान्याबाबत कायद्याच्या तरतुदीनुसार आराखडा (Resolution Plan) पारीत केला आहे.

- सर्व भागधारक यांची विभागणी आर्थिक सुरक्षीत धनको व आर्थिक असुरक्षीत धनको अशी केली. नियमानुसार करार मदार करुन कारखान्याच्या मालमत्तेवर गहाणखत करुन बोजा चढविणारे, तदनंतर कर्ज वाटप करणारी बँक ही आर्थिक सुरक्षीत धनको (Secured Financial Creditors) आहे. तर कायदेशीर तारण न घेता वित्त पुरवठा करणाऱ्या इतर संस्था या असुरक्षीत धनको (Unsecured Financial Creditors) राहील्या Operational Creditors, कामगार, शेतकऱ्यांचे एफ. आर. पी. देणे, कायदेशीर (कर व शुल्क) देणे, प्रॉव्हीडंड फंड या सर्व असुरक्षीत धनको यांच्या दाखल क्लेम्स पैकी मान्य मुल्यांकन अहवालानुसार होणारी किंमतीनुसार CoC (Committee of Creditors) च्या योजनेनुसार वाटप करण्यात आले. यामध्ये शेतकऱ्यांच्या एफ. आर. पी. बाकीच्या दाव्याची आर. आर. सी. आदेशानुसार देय व थकीत रक्कमेपैकी नियमानुसार रु. ४९.२६ कोटी पैकी रक्कम रु. २५.६९ कोटी दावा मान्य करण्यात आला. यापैकी रु. १०.५९ कोटी रोख रक्कमेने व रु. १५/- कोटी रक्कम भागांच्या स्वरुपात संचयी पसंती समभागांचे वाटप (Allotment of Cumulative Preference Shares) जे वाटप तारखेनंतरच्या पाच वर्षानंतर देय होतील या प्रमाणे निर्णय NCLT कोर्टाने केला.
- शेतकऱ्यांच्या देण्यासाठी NCLT कोर्टाने रु. १०.०० कोटीची बँक गॅरंटी १५ महिन्यांसाठी घेतली व उरलेल्या पाच कोटी रक्कमेची बारा महिन्यासाठी बँक गॅरंटी देण्याबाबत आदेश केले. NCLT कोर्टाने या कारखान्याच्या आराखडा (Resolution Plan) च्या अंमलबजावणीसाठी एक महत्वाची समिती (Core Committee) नियुक्त केली.

  यामध्ये : १. Resolution Professional (अध्यक्ष)

  २. Resolution Applicant चे २ प्रतिनिधी

भारतीय स्टेट बँकेचा एक प्रतिनिधी

४. कॉसमॉस बँकेचा एक प्रतिनिधी.

५. इन्फोटेक FDS चा एक प्रतिनिधी.

६. भारती सहकारी बँकेचा एक प्रतिनिधी.

७. ऊस पुरवठादार शेतकऱ्यांचा चा एक प्रतिनिधी.

- या समीतीने आराखडा (Resolution Plan) नुसार कामकाज करणे बंधनकारक आहे. केंद्रीय कंपनी अधिनियम १९५६ नुसार स्थापित या ट्रिब्युनलचे कार्यकक्षेत वरील प्रमाणे सद्यस्थितीत आदेश होत आहेत.
- सर्वात महत्वाचा भाग म्हणजे यामध्ये ऊस पुरवठादार शेतकऱ्यांच्या थकीत एफ. आर. पी. रक्कमांबरोबर शासनाच्याही देय रक्कमां या असुरक्षीत धनको (Unsecured Creditors) अशा ठरविण्यात आलेल्या आहेत व नियमानुसार करार-मदार करुन आवश्यक ते गहाणखत घेवून मग वित्त पुरवठा करणाऱ्या संस्था, बँक यांना सुरक्षीत धनको (Secured Creditors) म्हणून प्राथम्य मिळाले आहे. कंपनी अधिनियम १९५६ नुसार स्थापित खाजगी कारखान्यांच्याबाबत कार्यपध्दती सर्वांना माहिती व्हावी या उद्देशाने लिहीली आहे.
- याच प्रकारचा निर्णय NCLT ने महाराष्ट्र शेतकरी शुगर्स लि. परभणी या खाजगी कारखान्याच्याबाबतीत (MA) 3199/2019 in CP No. 1767of 2017 मध्ये दि. ०७. ११.२०१९ रोजी दिलेला आहे.

अशा परिस्थितीमध्ये आर. आर. सी. आदेशाची अंमलबजावणी पुर्णांशाने होत नाही ही वस्तुस्थिती आहे.

----- ००० -----

प्रकरण-५
मालमत्तेचे मुल्यांकन व सार्वजनिक यंत्रणांद्वारे विक्री

जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या अंतर्गत जमीन महसूलाची थकबाकी म्हणून वसूली करताना जंगम व स्थावर मालमत्तेची विक्री करण्यात येते यात "हातची किंमत ठरवणे" (Fixation of Upset Price), मालमत्तेच्या किंमतीचा पुनर्विचार करणे (Review of Upset Price), या बाबींचा समावेश होतो. सदर मालमत्तेची सार्वजनिक यंत्रणाद्वारे लिलाव विक्री करताना विविध न्यायालयीन निर्णयांच्या पार्श्वभूमीवर दक्षता घेणे आवश्यक ठरते.

अ) मालमत्तेचे मुल्यांकन (Valuation of Property)

१) मुल्यांकनाच्या कामामध्ये विषयाबाबतचे कौशल्य, बाजारपेठेचे ज्ञान व मालमत्तेच्या श्रेणीचे विशिष्ट ज्ञान यांचा समावेश असतो. संबंधितांना मुल्यांकनाबाबतच्या न्यायालयीन उदघोषणांची माहिती असण्याची आवश्यकता असते. लिलावासाठी ठेवण्यात येणाऱ्या मालमत्तेचे अचूक मुल्यांकन, पात्र मुल्यांकनकारांकडून करुन घेणे महत्वाचे आहे.

२) मुल्यांकनाच्या कामासाठी मुल्यांकनकार हे **संपत्ती कर अधिनियम १९५७ (Wealth Tax Act, 1957)** खाली नोंदविले जातात. अशा मुल्यांकनकारांची माहिती जिथे आयकर/संपत्तीकर अधिकाऱ्यांची कार्यालये असतात, तेथे मिळू शकते. **संपत्तीकर अधिनियम १९५७ सेक्शन 34 AB** खाली त्यांची नोंदणी होते. **संपत्तीकर अधिनियम नियम 8A** अंतर्गत विविध प्रकारच्या मालमत्तेच्या स्वरुप व श्रेणीनुसार संबंधित मुल्यांकनकाराची वेगवेगळी पात्रता नमूद केली आहे.

३) **संपत्तीकर अधिनियम १९५७ अनुसार वेगवेगळया मुल्यांकनकारांचे प्रकार खालीलप्रमाणे आहेत.**

- अचल मालमत्तेचे (Immovable Property) मुल्यांकनकार (शेतजमीनी, लागवड, जंगले, खाणी इ.वगळून)
- शेतजमीनीचे तज्ञ मुल्यांकनकार
- कॉफी, चहा, रबर लागवडीचे, जंगल, खाणी, दगडखाणीबाबतचे तज्ञ मुल्यांकनकार
- स्टॉक, समभाग डिबेंचर्स, सिक्युरिटीज, भागीदारी फर्म मधील भाग व व्यवसाय मालमत्ता याबाबतचे तज्ञ मुल्यांकनकार

- यंत्रसामुग्री व प्लांट (Machiney & Plant) याबाबतचे तज्ञ मुल्यांकनकार
- जडजवाहीर, दागिन्यांबाबतचे तज्ञ मुल्यांकनकार
- जंगम मालमत्तेमधील वाहनांच्या मुल्यांकनाबाबत RTO विभागाने केलेले मुल्यांकन घेतात. जर लिलावात जप्त केलेली आणि विक्रीसाठी ठेवण्यात आलेली मालमत्ता वरील नमुद केलेल्या वेगवेगळया प्रकारात मोडत असेल तर, अशा वेगवेगळया प्रकारच्या मालमत्तेचे मुल्यांकन करण्यासाठी नियमानुसार पात्रता धारण करणाऱ्या वेगवेगळया मुल्यांकनकारांची नियुक्ती लिलावापूर्वी होते.

  उदाहरणार्थ, जर मालमत्ता 'जमीन आणि इमारत' (Law & Building) व कारखाना आणि यंत्रसामुग्री (Plant & Machinery) अशी असेल तर त्यासाठी स्वतंत्र दोन मुल्यांकनकार यांची नियुक्ती होईल.

  विषयानुसार पात्रता धारण करणाऱ्या तज्ञ नोंदणीकृत मुल्यांकनकारांची यादी आयकर विभागाकडे असते. सपत्तीकर अधिनियम १९५७ नुसार यांचे शुल्क निर्धारीत केले जाते. संपत्तीकर अधिनियमांनी ठरवलेले शुल्क रचनेनुसार शुल्क संरचना मान्य असणाऱ्या पात्र मुल्यांकनकारांची त्या त्या प्रकारच्या संपत्तीचे मुल्यांकन करण्यासाठी नियुक्ती होते.

- **मुल्यांकनकारास द्यावयाचा मोबदला:-** संपत्तीकर अधिनियम नियम, १९५७ नियम ८C अनुसार ठरविण्यात आलेल्या शुल्क संरचनेनुसार संबंधित पात्रता धारण करणाऱ्या व नोंदणीकृत असलेल्या मुल्यांकनकारास नियमानुसार मोबदला देण्यात येतो. जास्तीत जास्त रु. ५०,०००/- इतकी कमाल मर्यादा (Maximum Cap) हा प्रत्येक कॅटेगरीसाठी ठरविण्यात आलेला आहे.
- **मुल्यांकनकाराने द्यावयाच्या अहवालात आवश्यक असणाऱ्या बाबी:-**
  संपत्तीकर अधिनियम नियम १९५७, नियम ८ड मध्ये 'मुल्यांकन अहवाल' मध्ये कोणत्या बाबी समाविष्ट असाव्यात याचा तपशिल दिला आहे.

१) **'वाजवी बाजार मुल्य' (Fair Market Value)** :- वाजवी बाजार मुल्य हे जप्त केलेल्या आणि विक्रीस ठेवलेल्या मालमत्तेचे सध्याचे बाजार मुल्य दर्शवते.

२) **मालमत्तेची विक्री झाल्यास बाजारातून त्यापासून मिळणारी किंमत (Realisable Value/Market Realisable Value) MRV** :- जप्त केलेल्या व विक्रीयोग्य मालमत्तेचा पारदर्शकरित्या व कमीतकमी कालावधीत लिलाव झाल्यास लिलावाच्या अटींनुसार मालमत्तेच्या विक्रीतून प्राप्त होणारी जास्तीत जास्त रक्कम.

३) **जबरदस्तीने विक्री होणाऱ्या मालमत्तेची किंमत (Distress Value/Forced Liquidation Value) :-** जेव्हा विक्रेत्यास वास्तु, इमारती व इतर जप्त केलेल्या मालमत्तेची जबरदस्तीने विक्री करणे भाग पाडले जाते, अशा विक्रीपासून मिळणारे हे मुल्य आहे. कमीत कमी कालावधीमध्ये अशा मालमत्तेची विक्री करावी लागते. याचा फायदा खरेदीदारास मिळतो. या पध्दतीने मिळणारे 'विक्री मुल्य' हे इतर पध्दतीने होणाऱ्या विक्रीपेक्षा तुलनेने कमी असते. जबरदस्तीने विक्री होणाऱ्या मालमत्तेची मिळणारी किंमत ही सहसा बाजारमुल्यापेक्षा कमी असू शकते.

४) **तयार हिशोब मुल्य (Ready Reckoner Value) :- शासकीय दर/मुल्य :**
'जमीन'/'इमारती' सारख्या अचल मालमत्तेची Ready reckoner value ही मुद्रांक आणि नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य यांचेकडून दरवर्षी प्रकाशित होते. हे शासकीय दर असतात.

ब) लिलावासाठी मालमत्तेची 'हातची किंमत' ठरवणे (Fixing Upset Price for Auction) :

'हातची किंमत' म्हणजे जप्त करुन विक्रीचा होणाऱ्या स्थावर मालमत्तेची केलेली अशी किंमत आहे की, ज्या किंमतीच्या खाली सदर मालमत्तेची विक्री करता येणार नाही.

> महाराष्ट्र जमीन महसुलाच्या वसुलीबाबत नियम, १९६७, नियम १३ नुसार हातची किंमत निश्चित करण्याबाबत व्याख्या नमूद आहे. ''कोणतीही जमीन किंवा इतर मालमत्ता जाहीर लिलावाने विकण्यात येईल. त्याबाबतीत हातची किंमत, जिल्हाधिकाऱ्यास योग्य वाटल्यास त्याप्रमाणे ठरविण्यात येईल''

कसुरदाराच्या विक्री होणाऱ्या स्थावर मालमत्तेत त्याच्या असलेल्या हक्काबाबत (असल्यास) मालमत्तेच्या ७/१२ वर कॉलम ३ मध्ये सदर भाराबाबत इत्यादीची माहिती नमूद असते. महाराष्ट्र जमीन महसूलाच्या वसूलीबाबत नियम, ६७, नियम १२(२) (क) नुसार नमुना ७ मध्ये अशा मालमत्तेच्या विक्रीची उद्‌घोषणा करुन लेखी नोटीस द्यावी लागते.

- **वाजवी बाजार मुल्य (Fair Market Value), ii) Realisable Value, iii) Distress Value, iv) Ready reckoner value/शासकीय दर मुल्य**, तशाच प्रकारच्या मालमत्तेच्या विक्रीपासून मिळालेले मुल्य. या चारही रक्कमांवरुन जप्त केलेल्या आणि विक्री करावयाच्या स्थावर मालमत्तेच्या मुल्याची 'हातची किंमत' ठरविण्यात येते. पहिल्या लिलावापूर्वीच्या उद्घोषणापूर्वी अशी किंमत ठरवली जाते. अशा मालमत्तेचे मान्य मुल्यांकन अहवालात दर्शवलेले 'वाजवी बाजार मुल्य' (fair market value) व तयार हिशोब मुल्य (Ready Reckoner Value) /शासकीय दर मुल्य उपलब्ध असल्यास **यामध्ये जे जास्त असेल ती 'हातची किंमत'** असते या रक्कमेची उद्घोषणा करावयाच्या नोटीसमध्ये उल्लेख असतो. लिलावासाठी होणारा/झालेला खर्च (उदा.जाहिरात, मुल्यांकन इत्यादीसाठी झालेला खर्च) हा हातच्या किंमतीमध्ये अंतर्भुत होत नाही. परंतु विक्रीनंतर मिळणाऱ्या रक्कमेतून सदर खर्च वसूल केला जातो.

- सक्षम प्राधिकारी जप्त केलेल्या व विक्रीयोग्य स्थावर मालमत्तेच्या हातच्या किंमतीबाबत (Upset Price) बाबत ज्या कसुरदाराच्या मालमत्तेची विक्री होणार आहे. याबाबत त्यास काही आक्षेप असल्यास ते लेखी देण्याबाबत लेखी सुचित करतात. कसूरदाराच्या लेखी आक्षेपास अनुसरुन पुरावा जसे संपत्तीकर अहवाल अधिनियम १९५७ किंवा Insolvency & Bankruptcy Code १६ नुसार पात्र मुल्यांकनकाराचा 'मुल्यांकन अहवाल' देणे अपेक्षीत असते. सदर अहवालाचे अवलोकन केल्यानंतर जर जप्त केलेल्या व लिलाव होणाऱ्या मालमत्तेचे 'हातची किंमत' या कसुरदाराने दावा केलेल्या पात्र मुल्यांकन अहवालातील किंमतीपेक्षा कमी असल्यास लेखी कारणे नमूद करुन लिलाव पुढे ढकलला जातो. महाराष्ट्र महसूल अधिनियम १९६६ चे **कलम १९५ चा आधार** यासाठी घ्यावा.

कलम १९५- विक्री तहकूब करणे. कोणत्याही पुरेशा कारणास्तव विक्री वेळोवेळी तहकूब करता येईल. परंतु तीस दिवसापेक्षा अधिक मुदतीसाठी विक्री तहकूब करण्यात आली असेल तेव्हा नवीन उद्घोषणा करण्यात येईल आणि नवीन नोटीस देण्यात येईल. मात्र कसूर करणात्या व्यक्तीने संमती दिल्यास अशी नवीन उद्घोषणा करण्याची किंवा नवीन नोटीस देण्याची जरुरी नाही.

जर ‘हातची किंमत’ ठरविण्याबाबत हरकत घेण्यात आली नाही तर लिलावाद्वारे कसुरदार/ तिच्या प्रतिनिधीचे रोजनामा पत्रावर स्वाक्षरी घेण्यात येते. जर कसुरदार लिलावास हजर राहीला नाही किंवा त्याने त्याच्या दाव्यापृष्ठयर्थ काही पुरावे (Evidence), जसे पात्र मुल्यांकनकाराचा मुल्यांकन अहवाल इ. दिले नाही तर सक्षम प्राधिकाऱ्याने जप्त व विक्री होणाऱ्या मालमत्तेची हातची किंमत (विभागाने नियुक्त केलेल्या मुल्यांकनदाराच्या अहवालानुसार) निश्चित केली जाते.

- सदर होणाऱ्या लिलावाची पुरेशी व नियमानुसार प्रसिध्दी स्थानिक/प्रादेशिक वर्तमानपत्रात दिली जाते. जर शक्य झाले तर लिलावासंबंधीत वेबसाईटवरही देण्यात येते. जेणेकरुन त्यास जास्तीत जास्त प्रसिध्दी मिळेल. असे प्रयत्न केले जातात.

क) लिलावाची प्रक्रीया खरेदीदारांच्या अभावी पार पडू न शकल्यास ‘हातची किंमत’/Upset Price चा पुनर्विचार :-

बऱ्याचदा सर्व प्रक्रिया नियमानुसार पार पाडून, पुरेशी प्रसिध्दी देवूनही लिलावासाठी, Upset Value इतकी रक्कम देवून खरेदी करण्यासाठी बोलीदार पुढे येत नाहीत. त्यामुळे लिलावाची प्रक्रीया पुर्ण होऊ शकत नाही.

अशा परिस्थितीत

i) जेव्हा **पहिल्या** लिलावाची प्रक्रिया बोलीदारांअभावी पुर्ण होऊ शकत नाही किंवा ठरवलेल्या हातच्या किंमतीपेक्षा कमी रक्कमेची बोली लावली जाते. तेव्हा **दुसऱ्या** लिलावाची उद्घोषणा करण्यापूर्वी हातची किंमत/Upset Price ही **‘Realisable value’** किंवा **शासकीय दर** म्हणजेच मुद्रांक व नोंदणी महानिरीक्षक यांनी प्रसिध्द केलेले **‘शासकीय दर’/Ready reckoner value यापैकी जास्त असलेल्या किंमतीस ठरवली जाते.** सदर ठरवलेली किंमत तात्काळ सर्व संबंधितांना कळवून याची दक्षता दुसऱ्या लिलावाची प्रक्रिया होणाऱ्या दिवसापूर्वी केली जाते.

ii) जर **दुसऱ्या** लिलावाची प्रक्रियाही लिलावाची बोली लावणाऱ्या बोलीधारकांअभावी पुर्ण होऊ शकली नाही. अथवा ठरवलेल्या 'हातच्या किंमतीपेक्षा' कमी रक्कमेची बोली येते. अशा परिस्थितीत **तिसऱ्या** लिलावाची उद्घोषणा करण्यापूर्वी शासकीय मूल्य म्हणजेच **Ready Reckoner Value** किंवा **IGR/ मुद्रांक व नोंदणी महानिरीक्षक** यांनी प्रसिध्द केलेल्या दराइतकी **किंवा** मान्य मुल्यांकन अहवालातील मुल्यांकनकाराने ठरवलेल्या **Distress value इ. किंवा** मान्य मुल्यांकन अहवालात नमूद **'बाजारमुल्य'/Fair Market Value च्या ७५% या ३ ही पैकी जी जास्त रक्कम असेल तितकी 'हातची किंमत' (Upset Price) ठरविली जाते.** तिसऱ्या लिलावाच्या 'हातच्या किंमतीत' झालेल्या बदलास पुरेशी प्रसिध्दी लिलावापूर्वी दिली जाते व संबंधितांनाही तातडीने झालेला बदल कळवला जातो.

- संबंधित प्रक्रिया ही नियमानुसार विधीवत पार पाडूनही व पुरेशी प्रसिध्दी देवूनही बोली पासून पुढे न आल्याने पार पडू शकली नाही किंवा ठरविलेल्या हातच्या किंमतीपेक्षा कमी रक्कमेची बोली येत आहे अशी सक्षम अधिकाऱ्याची खात्री पटल्यानंतरच हातच्या किंमतीचा पुनर्विचार पुढील लिलावापूर्वी करतात. सक्षम अधिकाऱ्याच्या लगतच्या वरिष्ठ अधिकाऱ्याच्या पुर्वपरवानगीने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६, कलम २५८ मधील तरतूदीनुसार Upset Price चा पुनर्विचार करतात.

- दुसऱ्या लिलावाची प्रक्रीया ही पहिल्या लिलावाच्या दिवसानंतर ३ महिन्याचे आत तर तिसऱ्या लिलावाची प्रक्रीया दुसऱ्या लिलावाच्या दिवसानंतर ३ महिन्याच्या आत पार पाडली जाते.

ड) शासकीय दरानुसार झालेल्या तिसऱ्या लिलावाची प्रक्रियाही बोली अभावी पार पडू शकत नाही. तेंव्हा करावयाची कार्यपध्दती. :

अशा परिस्थितीत विभागाने सदरहू जप्त केलेली व विक्रीयोग्य मालमत्ता नाममात्र लिलाव किंमतीत खरेदी करावी. ही प्रक्रिया महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम ६६ कलम २२० नुसार पार पाडली जाते.

कलम २२०. नाममात्र बोलीवर खरेदी करणे :

या प्रकरणाच्या तरतुदींअन्वये केलेल्या कोणत्याही विक्रीमध्ये कोणीही बोली बोलणारी व्यक्ती नसेल किंवा करण्यात आलेली बोली अपुरी किंवा नाममात्र असेल त्याबाबतीत, जिल्हाधिका-याने, राज्य शासनाच्या वतीने अशी मालमत्ता त्याच्या दुय्यम अधिका-यापैकी कोणत्याही अधिका-यास असा दुय्यम अधिकारी बोली करील अशा बोलीवर खरेदी करण्यासाठी प्राधिकृत करणे कायदेशीर असेल:

परंतु अशा रीतीने खरेदी करण्यात आलेली मालमत्ता ही त्यानंतर खरेदी केल्यापासून बारा वर्षांच्या आत राज्य शासनाकडून विकली गेली तर, विक्रीपासून मिळालेल्या उत्पन्नातून पुढील रकमा वसूल करण्यात येतील आणि त्यानंतर रक्कम शिल्लक राहिल्यास ती, ज्या व्यक्तीची मालमत्ता विकण्यात आली असेल त्या व्यक्तीस देण्यात येईल :----

(अ) देणे असलेली रक्कम म्हणजेच व्याजासहित बाकी असलेली मुद्दलाची रक्कम ;

(ब) राज्य शासनाकडे जमीन असताना आणि कोणत्याही व्यक्तीने ती पट्ट्याने किंवा अन्यथा घेतली नसेल त्या कालावधीमध्ये राज्य शासनाचे महसूलविषयक कोणतेही नुकसान झाले असेल तर असे नुकसान ;

(क) लिलावातील विक्रीमध्ये झालेला प्रत्यक्ष खर्च ;

(ड) मुद्दलाच्या एक चतुर्थांश रक्कमे इतकी शास्ती :

परंतु आणखी असे की, पूर्वोक्तप्रमाणे जर तद्नंतर मालमत्ता विकण्यात आली नसेल तर, दक्त मालमत्ता मागील परंतुकामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आल्याप्रमाणेच्या रकमा कसूर करणा-या व्यक्तीन दिल्यानंतर, राज्य शासनाच्या वतीने ती खरेदी करण्यात आल्याच्या दिनांकापासून बारा वर्षे मुदतीचे आत कोणत्याही वेळी, दक्त कसूर करणा-या व्यक्तीस परत करण्यात येईल किंवा, यथास्थिती, शासनाने ती खरेदी करण्याच्या लगतपूर्वी तिने ज्या भूधारणापद्धतीवर ती धारण केली होती त्या भूधारणापद्धतीवर तिला देण्यात येईल.

वसुली अधिकारी अशी मालमत्ता सक्षम अधिकाऱ्याची मान्यता घेऊन, त्याच्या नावे खरेदी करतात.

इ) विक्रीस मान्यता देणे, लिलाव रद्द करणे, आक्षेपांवर सुनावणी घेणे, विक्री प्रमाणपत्र जारी करणे व आवश्यक ते कागदपत्र/रेकॉर्ड जतन करणे. याबाबत नियमानुसार सक्षम अधिकाऱ्याने कार्यवाही करतात:

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम ६६ कलम २१५ नुसार दक्षताही या प्रकरणांत घेतली जाते.

कलम २१५.शिल्लक राहीलेली रक्कम न्यायालयाच्या आदेशाखेरीज धनकोस न देणे:

उक्त शिल्लक राहिलेली रक्कम दिवाणी न्यायालयाच्या आदेशाखेरीज ज्या व्यक्तीची मालमत्ता विकण्यात आली आहे अशा व्यक्तीच्या कोणत्याही धनकोस देय होणार नाही. शिल्लक राहिलेची रक्कम न्यायालयाच्या आदेशाखेरीज धनकोस न देणे. शिल्लक राहीलेची एक दिवाणी न्यायालयाच्या आदेशाखेरीज ज्या व्यक्तीची मालमत्ता विकण्यात आली आहे. अशा व्यक्तीच्या कोणत्याही धनकोस देय होणार नाही.

वरील प्रमाणे दक्षता घेतल्याने जप्त केलेल्या आणि विक्री योग्य मालमत्तेचे अचूक मुल्य शासनास मिळू शकते व प्रकिया पारदर्शकपणे व कोणत्याही अडचणींशिवाय पार पाडण्यास मदत होते.

------ ००० ------

प्रकरण -६

शेतकरी बांधवांनो इकडे लक्ष द्या :

आर.आर.सी. झालेल्या काररखान्याच्या बाबतीत आरआरसी कार्यवाही पुर्ण होईपर्यंत ऊस पुरवठादार शेतकरी यांचे पैसे दिले जात नाहीत किंवा अशी कारवाई करताना बराच कालावधी झालेला असतो. यास्तव शेतकरी वेगवेगळया पध्दतीने सर्वत्र दाद मागत असतो. जोपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सोपविलेली आरआरसी ची प्रक्रिया पुर्ण होत नाही तोपर्यंत त्या ऊस उत्पादकाला पैसे मिळणार नाहीत हि वस्तुस्थिती असल्याने या कायदेशीर प्रक्रिया पार पाडण्याच्या कार्यपध्दतीची माहिती प्रत्येकाला असणे आवश्यक आहे.

कारखान्याची आर. आर. सी. (ऊस बिलाची थकबाकी ही जमीन महसूलाची बाकी आहे असे समजून वसूली करण्याबाबत संबंधित जिल्हाधिकारी यांना काढलेले आदेश असतात.) संबंधीत शेतकरी बांधवांनी ज्या कारखान्यांकडून त्यांचे एफ. आर. पी. बीलाची थकीत रक्कम येणे आहे व ज्या कारखान्यांचे साखर आयुक्त यांनी जिल्हाधिकारी यांचे नांवे वसूलीबाबत आदेश निर्गमीत केलेले आहेत. अशा प्रकरणात खाली नमुद केल्यानुसार कृती करावी. --

टप्पा १)

- सदर कारखाना कोणत्या प्रादेशिक कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात येतो ते प्रथम पहावे.
- सदर कार्यालयाचे अधिकाऱ्याचे नांव, कार्यालयाचा फोन नंबर, पत्ता, ई-मेल आयडी हा वरील पान क्र.७९ व पान क्र.८० वर लिहिला आहे तो पहावा.
- आपल्या कार्यक्षेत्रातील प्रादेशिक सहसंचालक (साखर) यांच्या पत्त्यावर तक्रार दाखल करावी.
- त्या कारखान्याशी अडचण सोडविण्याबाबत केलेला पत्रव्यवहार सोबत जोडावा.
- ई-मेल करणे शक्य असल्यास संबंधित प्रादेशिक कार्यालयाच्या ई-मेल पत्त्यावर करावा.
- ई-मेल ने केलेल्या पत्रव्यवहारामुळे तात्काळ कार्यवाही करणे शक्य होते व हा नियमित पुरावा म्हणून गणला जातो.

टप्पा २)

- आपल्या कारखान्याच्याबाबत आर. आर. सी. ची कार्यवाही झाली आहे का याची खात्री करावी आणि सदर कारखान्याच्याबाबत आर. आर. सी. ची कार्यवाही झाली असल्यास: साखर आयुक्त यांनी काढलेले आदेश प्रादेशिक कार्यालय यांचेकडून प्राप्त करुन घ्यावे.
- संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाशी आवश्यकतेनुसार संपर्क साधून साखर आयुक्त यांनी काढलेल्या आदेशावर कोणती कार्यवाही केली याची विचारणा करावी.
- संबंधित तालुक्याचे तहसिलदार हे आर. आर. सी. प्रमाणे कार्यवाही करण्यासाठी नियुक्त केलेले असतात.
- तहसिलदार यांच्या कार्यालयात आवश्यकतेनुसार जावून साखर आयुक्त यांच्या आदेशाची अंमलबजावणी कुठपर्यंत आली याचा तपशिल घ्यावा.
- कारखान्यावर आर. आर. सी. झाल्यानंतर प्रादेशिक सहसंचालक (साखर) यांचे मार्फत संबंधीत तहसिलदार यांना ऊस पुरवठादार व त्यांना द्यावयाच्या थकीत एफ. आर. पी. च्या रक्कमांची यादी दिली जाते. या यादीमध्ये :-
  - ➢ आपले नांव आहे काय ?
  - ➢ नोंदविलेली ऊस बिलाची त्यांना देणे बाकी असलेल्या रकमेचा तपशिल अचूक आहे का ?

  याची खात्री करावी. या याद्या संबंधित कारखान्याने सदर कार्यालयाकडे पुरविलेल्या असतात. या याद्यांची प्रत संबंधित प्रादेशिक सहसंचालक (साखर) यांच्या कार्यालयाकडे सुध्दा असते.
- वरील तपशिलात तफावत असल्यास यादीतील तपशिल बरोबर करुन घ्यावा.
- आर. आर. सी.ची कार्यवाही संबंधित तहसिलदार/प्रांत/जिल्हाधिकारी कार्यालयाने पुर्ण करावयाची असल्याने सदर कार्यालयाच्या संपर्कात राहून पाठपुरावा करावा.

आर. आर. सी. चा आदेश जिल्हाधिकारी कार्यालयाला मिळाल्यानंतर कारखाना ज्या अधिकाऱ्याच्या कार्यक्षेत्रात आहे त्या संबंधित तहसिलदार यांची नियुक्ती सदर आदेशाची अमलबजावणी करण्यासाठी केली जाते. आरआरसीच्या आदेशाची अमलबजावणी करताना प्रथम संबधित प्रादेशिक कार्यालयाशी संपर्क

साधुन कारखान्याची जेवढया रकमेची आर. आर. सी. काढण्यात आलेली आहे त्या रकमेची विगतवारी म्हणजेच थकीत एफआरपी असणा-या शेतक-यांची यादी, त्यांनी पुरविलेला ऊस व त्याची थकीत व देय रक्कम याचा तपशिल कारखान्याकडून घेण्यात यावा. समन्वयासाठी नियुक्त संबंधीत प्रादेशिक सहसंचालक साखर या कार्यालयाशी संपर्क साधुन कारखान्याची स्थावर व जंगम मालमत्तेचा विहित नमुन्यातील तपशिल सर्वप्रथम प्राप्त करून घ्यावा. या प्रक्रियेत कालपव्यय टाळावा जेणेकरुन आर. आर. सी. प्रमाणपत्राची प्रभावी अंमलबजावणी अर्थात वसूली त्वरीत होवू शकेल आणि त्यामुळे बाधीत शेतकरी बांधवांना त्यांच्या थकीत आणि देय रक्कम त्वरीत मिळण्यास मदत होईल.

आर. आर. सी. माहिती मिळवण्यासाठी ज्या कारखान्याची आर. आर. सी. काढली आहे, सदर कारखाना कोणत्या कार्यालयाच्या अधिकार क्षेत्रातील आहे व त्याबाबत आवश्यकती कार्यवाही करणारे/माहिती देणारे कार्यालय कोणते आहे ? त्याची तपशिल पुढीलप्रमाणे :-

प्रादेशिक सहसंचालक (साखर) कार्यालयाचे पत्ते व संपर्क क्रमांक

अ.क्र.	प्रादेशिक सहसंचालक	कार्यक्षेत्रातील जिल्हे
१	प्रादेशिक सहसंचालक (साखर), पुणे साखर संकुल, पहिला मजला, शिवाजीनगर, पुणे-४११००५ दूरध्वनी (०२०)२५५३८०४१ ते ४४ rjdsug.pune@gmail.com	पुणे, सातारा
२	प्रादेशिक सहसंचालक (साखर), कोल्हापूर घर नं १३१५, सी वार्ड सरोज अपार्टमेंट लक्ष्मीपुरी, कोल्हापूर-०२ दूरध्वनी (०२३१)२६४०४०० rjdkop@gmail.com	कोल्हापूर, सांगली, रत्नागिरी, सिंधुदूर्ग
३	प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहमदनगर त्रिलोक चेंबर्स, दुसरा मजला, लाल टाकी रोड, अहमदनगर -४ दूरध्वनी (०२४१)२४३१६६९/२३२७२३८ rjdahmednagar@rediffmail.com	अहमदनगर, नाशिक,
४	प्रादेशिक सहसंचालक (साखर), औरंगाबाद भूविकास बँक इमारत, क्रांती चौक, औरंगाबाद दूरध्वनी (०२४०)२३३१४७० rjdaurangabad१२३@gmail.com	औरंगाबाद, बीड, जालना, जळगाव, धुळे, नंदुरबार
५	प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड दुसरा मजला, भूविकास बँक इमारत, शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था समोर, नांदेड दूरध्वनी (०२४६२)२५४१५६ rjdsnanded@gmail.com	नांदेड, लातूर, परभणी, हिंगोली

६	प्रादेशिक सहसंचालक (साखर), अमरावती सहकार संकुल, कोमा नगर (कॅम्प), खामगाव अर्बन सहकारी बँकेजवळ, अमरावती ४४४६०१ दूरध्वनी (०७२१)२६६७१४४/२६६०५८४ rjdamr@gmail.com	अमरावती, अकोला, बुलडाणा, यवतमाळ, वाशिम
७	प्रादेशिक सहसंचालक (साखर), नागपूर नवीन प्रशासकीय इमारत, २ विंग ए, सहावा मजला, जिल्हा परिषद समोर, सिव्हील लाईन्स, नागपूर -१ दूरध्वनी (०७१२)२५३५२८१ rjdnagpur@gmail.com	नागपूर, भंडारा, गोंदीया, चंद्रपूर, गडचिरोली.
८	प्रादेशिक सहसंचालक (साखर), सोलापूर २६/२७, मद्दा मंगल कार्यालय, कन्ना चौक, रविवार पेठ, सोलापूर-४१३००५ rjdsugarsolapur@gmail.com	सोलापूर, उस्मानाबाद

------०००------

श्री. शेखर नारायण गायकवाड (भा.प्र.से.)

एम.एससी.(कृषि), एम.ए. (समाजशास्त्र), एम.ए. (तत्वज्ञान),
एल.एल.बी.

भारतीय प्रशासकीय सेवेतील २००२ च्या तुकडीतील अधिकारी. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मुख्य प्रशासकिय अधिकारी (२०००-२००५), अप्पर जिल्हाधिकारी, नाशिक (२००५-२००९), "यशदा" येथे निबंधक (२००९-२०१०), मुख्यमंत्र्याचे सहसचिव (२०१०-२०१३), मुख्य कार्यकारी अधिकारी, ठाणे (२०१३-२०१५), जिल्हाधिकारी, सांगली (२०१५-२०१७), भूजल संचालक (२०१७-२०१८) म्हणून काम पाहिले. सध्या राज्याचे साखर आयुक्त. प्रशासकीय कारकिर्दीत नावीन्यपूर्ण कामकाजामुळे प्रसिद्ध. स्पर्धात्मक परीक्षेच्या तयारीसाठी हजारो विद्यार्थांना मार्गदर्शन, राज्यातील अनेक महसूल अधिकारी व कर्मचा-यांना कायदेविषयक प्रशिक्षण, यशदा, सिम्बोयिसिस, पुणे येथे व्याख्याता, जागतिक बँकेमार्फत बॅकॉंक येथे प्रशिक्षण संस्थांच्या व्यवस्थापनाबददल आंतरराष्ट्रीय कार्यशाळेत सहभाग (२००९), महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या कायदेशीर साक्षरतेसाठी मोलाची कामगिरी.

लेखन-

शेतक-यांनो सावधान (१९९६), फेरफार नोंदीची निर्गती- एक आदर्श कार्यपध्दती (१९९९), गोष्टीरूप जमीन व्यवहार नीती (२००२), शेतीचे कायदे (२००५), महसूल अधिका-याचे अर्धन्यायिक कामकाज (२००७), घरपोच धान्य योजना (२०१०), कायदा माहितीचा अन व्यक्ती स्वातंत्र्याचा (२०१०), शेतक-यांनो जमिनी सांभाळा (२०१०), प्रशासनाच्या नव्या वाटा (२०१२), Land Rights And Mutations In Maharashtra (२०१२), स्पर्धेच्या पलिकडे (२०१४), Land Issues in India (२०१६), Land Laws in Maharashtra (२०१७), एफ. आर. पी. (रास्त व किफायतशीर दर) माहितीपुस्तिका २०१९ हि पुस्तके प्रकाशित.

www.shekhargaikwad.blogspot.com

श्री. मंगेश भगवंत तिटकारे

एम.एससी.(बॉटनी), एम.ए. (समाजशास्त्र), एम.ए. (राज्यशास्त्र),एम.ए.(इतिहास),
एम.ए.(अर्थशास्त्र), पी.जी.डी.बी.ए. (एच.आर.), जी. डी. सी. & ए., एच. डी. सी. एम

वित्त व लेखा सेवा (वर्ग-२) संवर्गात सन १९९३ साली प्रशासकीय सेवेत रुजू. लेखा अधिकारी (भांडार पडताळणी) पुणे विभाग(१९९४-९६), सहकार खात्यामध्ये, सहाय्यक निबंधक, मा.वर्गीय गृहरचना, वि.स.क.अ., पुणे विभाग(१९९७-९८), सहाय्यक संचालक (साखर)(१९९८-२००४), सहाय्यक निबंधक (आस्थापना), सहकार आयुक्तालय(२००४-०८), उपनिबंधक (आस्थापना) सहकार आयुक्तालय (२००८-१२), उपसंचालक- पणन संचालनालय (२०१२-१५), जिल्हा उपनिबंधक- मुंबई शहर-१ (२०१५-जून २०१७), सध्या सहसंचालक (अर्थ) या पदावर साखर आयुक्तालय, पुणे येथे कार्यरत.

एफ. आर. पी. (रास्त व किफायतशीर दर) माहितीपुस्तिका २०१९ प्रकाशित.

Email – mangeshtitkare@gmail.com